ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

मे २०१० मूल्य १० रुपये




## निघाली 'ग्रंथसरिता'

'ग्रंथसरिता'चे उद्घाटन करताना राज्यपाल के. शंकरनारायणन




'पंखाविना भरारी'चे प्रकाशन – परेश मोकाशी, अनुराधा ठाकूर, लेखिका शरयू घाडी, डॉ. स्नेहलता देशमुख, विजयशीला सरदेसाई, कांचन सोनटक्के, नागेश घाडी



'जय हो!'चे प्रकाशन – मृणाल गोरे, गृहमंत्री आर. आर. पाटील, भाई वैद्य, लेखिका कमल देसाई, निखिल वागळे, नीलम शहा–नेरकर

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**मे २०१०**
**वर्ष ३० वे, अंक पाचवा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **दिलीप चावरे**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

महाराष्ट्र निर्मितीचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. सर्वांनी आपापल्या परीने निरनिराळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले होते. एक शासनाचा, एक शिवसेनेचा आणि एक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा. भाजपा हा प्रमुख विरोधी पक्ष. त्याच्या गोटात कोणताही उत्साह आढळला नाही. इतर विरोधी पक्ष तसे किरकोळच. एकंदरीत घडले असे. संपूर्ण महाराष्ट्राचा असा एकही कार्यक्रम करण्याची भूमिका दिसली नाही. राजकीय पक्षांची वर्तणूक अशी होती तर इतरेजनांना फारसा उत्साह दाखवेसे वाटले नाही. मुंबईच्या बाहेर तर जणू फाल्गनुमासच होता. वर्तमानपत्रांनी खास पुरवण्या काढल्या. त्यात मुख्यमंत्री, मंत्री, राजकीय मान्यवर आणि साहित्यक्षेत्रातील प्रतिष्ठितांची मनोगते आणि मुलाखती यांचा मारा होता. सगळे उज्वल भविष्याबद्दल भरभरून बोलत होते. मात्र बिकट वर्तमानकाळ अथवा दुर्भाग्यपूर्ण भूतकाळ यांच्याबद्दल जणू संगनमताने मौन राखण्यात आले. सुवर्णमहोत्सवाचे औचित्य साधून काही मराठी दैनिकांच्या संपादकांचे लेख या अंकात समाविष्ट करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचे अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या 'माझी घडण' या आत्मकथनाचा परामर्श घेणारा एक लेखही आहे. विकासप्रक्रिया, समाज, साहित्यिक आणि राजकारण यांचे परस्परसंबंध हा या विवेचनाचा विषय आहे. साहित्यिकांनी आपल्याच चक्रात मश्गुल असावे की समाजासमोरच्या ज्वलंत प्रश्नांची दखलही घ्यावी हा मुद्दा यापुढच्या काळात कळीचा ठरणार आहे. मराठी भाषिकांमध्ये कर्तबगार लोकांची उणीव नाही. मात्र त्यांना लिहिते करणे आवश्यक आहे. तरच वेगवेगळ्या क्षेत्रांतील विविध अनुभव वाचकांपर्यंत जातील. संरक्षण, परराष्ट्र कूटनीती, गुप्तचरांचे जग, नवनवे शोध, आंतरजालाबाबतच्या घडामोडी अशी अनेक क्षेत्रे मराठीसाठी जवळपास अस्पर्श आहेत. त्यांतही साहित्यिक अवगाहन सुरू होईल. महाराष्ट्र आणि मराठी भाषा ग्लोबल करण्यावर सध्या जोरदार भाषणे आणि विचारमंथन चालू आहे. त्यातले एक पाऊल म्हणून हा उपक्रम जरूर विचारात घेता येईल. यासाठी 'ग्रंथाली' आपल्यापरीने प्रयत्नशीलच आहेच. इतर कोणी मदत करणार असल्यास त्यांचे जरूर स्वागत होईल.

**– संपादक**

# आधुनिक महाराष्ट्राचे एक शिल्पकार : मोती बुलासा

## डॉ. विद्यागौरी टिळक

कोणत्याही संस्कृतीच्या घडणीमध्ये कलावंत, साहित्यिक, धार्मिक-सामाजिक क्षेत्रातले अध्वर्यू अशा अनेकानेक व्यक्तींचा मोलाचा वाटा असतो. संस्कृती घडवण्याच्या या कामाइतकेच ती घडण काय प्रकाराने झालेली आहे हे जोखण्याचे, -तिच्याविषयीचे आपले आकलन मांडण्याचेही काम महत्त्वाचे असते. कारण त्यामधून त्या संस्कृतीचा चेहरा अधिक स्पष्ट होत असतो.

जेव्हा संस्कृतीमध्ये स्थित्यंतर घडत असते, तेव्हा या दोन्ही गोष्टींना वेग आलेला असतो. मराठी संस्कृतीच्या संदर्भात पाहिले, तर एकोणिसाव्या शतकात असा एक मोठा गतिमान टप्पा येऊन गेलेला दिसतो. इंग्रजी राजवटीने आपल्याला आत्मपरीक्षणाला आणि आपल्या समाजाच्या पुनर्घटनेलाही भाग पाडले होते.

मोती बुलासा हे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातले महाराष्ट्रातल्या अशा कामांमध्ये मोलाचा वाटा उचलणाऱ्यांपैकी एक नाव. त्या टप्प्यावर महाराष्ट्रामध्ये चाललेल्या प्रार्थनासमाजासारख्या धर्मसुधारणेच्या चळवळींमध्ये, वाङ्मयीन उपक्रमांमध्ये मोती बुलासांचा जो सहभाग होता, त्याबाबत तत्कालीन संदर्भसाधनांमध्ये निर्देश सापडतात. त्यांनी चालवलेल्या 'सुविचारसमागम' या नियतकालिकाचे नावही त्या कालखंडाचा अभ्यास करणाऱ्यांपर्यंत पोहोचलेले असते. मात्र त्याच्या कर्त्याचे नाव मात्र महाराष्ट्रीय जनतेच्या स्मरणातून पुसट झाले होते. मोती बुलासांचा 'ऐन उमेदीत' अनेकांच्या त्यांच्याविषयी मोठ्या अपेक्षा असतानाच झालेला मृत्यू हे या विस्मरणाचे एक प्रमुख कारण होय.

मोती बुलासांचे नाव पुन्हा प्रकाशात आले ते इ.स.१९९८ मध्ये मराठी वाङ्मयाच्या इतिहासाची शताब्दी झाली तेव्हा. कारण शतकभरापूर्वी मराठी वाङ्मयेतिहासाची पायाभरणी करणाऱ्या अभ्यासकांमधले ते एक होते. त्यांनी लिहिलेला आणि नियतकालिकामध्ये दडून राहिलेला तो इतिहासही शताब्दिवर्षातच वाङ्मयेतिहासाचे व्यासंगी अभ्यासक डॉ. द. दि. पुंडे यांच्यामुळे पुस्तकरूपाने



(१८६९-१९००)
**कै. मोती बुलासा**

लोकांपुढे आला. या निमित्ताने लक्षात आले की त्यांच्याविषयीची उपलब्ध माहिती तशी अगदीच थोडी आहे. त्यांचे आडनाव 'भट्टड' असे दाते यांच्या नियतकालिक सूचीच्या पाचव्या खंडात नोंदवलेले आहे, परंतु अन्यत्र कुठेही त्याविषयी निर्देश नाही. त्या काळात आडनाव लावण्याची प्रथा सार्वत्रिक नव्हती, मारवाडी समाजात तर ती नव्हतीच. मोती बुलासा हे महाराष्ट्राबाहेरच्या खांडवा येथील एका मारवाडी व्यापारउदिम करणाऱ्या कुटुंबातले. त्यांचे हायस्कूलपर्यंतचे शिक्षणही तेथेच झाले. पुढे ते महाविद्यालयीन शिक्षणासाठी नागपुरास आले. तेथे प्रो.वा.ब. पटवर्धन यांच्या सहवासात त्यांना वाङ्मयाची गोडी लागली असावी, असे दिसते. बी.ए. झाल्यावर ते पुण्यात आले. इ.स.१८९५ मध्ये ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य झाले. काही काळ न्यू स्कूल व बोर्डिंगचे काम त्यांनी पाहिले. नंतर फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांनी अध्यापनाला सुरुवात केली.

पुण्यातील विविध सामाजिक-सांस्कृतिक संस्थांचे मोती बुलासा सदस्य होते. पुण्यात भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी खूप मेहनत घेतल्याचाही उल्लेख मिळतो. प्रार्थना समाजाचे ते निष्ठावान सदस्य आणि तळमळीचे कार्यकर्ते होते. ब्रिटिश अँड फॉरेन युनिटेरियन असोसिएशनच्या वतीने इंग्लंडमधील एकेश्वरवादाचा अभ्यास करण्यासाठी त्यांना दोन वर्षांची शिष्यवृत्ती मिळाली होती. त्यासाठी बोटीने इंग्लंडला जात असता १९०० सालच्या ऑक्टोबर महिन्याच्या आरंभी ते आजारी पडले आणि पोर्ट सैद येथील इस्पितळात एकाकी अवस्थेत संधिवाताच्या विकाराने त्यांचा मृत्यू झाला. पुढे महर्षी शिंदे यांना ही शिष्यवृत्ती मिळून ते इंग्लंडला गेले. आपल्या रोजनिशीत महर्षी शिंदे यांनी हा तपशील नोंदवला आहे.

बुलासांची वाङ्मयक्षेत्रातील कामगिरी अल्पावकाशातली असली तरी मोलाची आहे. 'सुविचारसमागमा'चा उल्लेख यापूर्वी आलाच आहे. प्रत्यक्ष निर्देश नसला तरी या

नियतकालिकाचे संपादन मोती बुलासा हेच करीत असत हे उपलब्ध पुराव्यांवरून स्पष्ट होते. मे १८९८ ते मे १९०१ या काळात ते चालू होते. त्या काळातल्या अनेक विद्वान साहित्यिकांचा पाठिंबा मिळवून सुविचार-समागमने आपले असे स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. त्यामुळेच त्याचा उल्लेख अनेक ठिकाणी येतो. याच नियत-भकालिकातून त्यांची मराठी भाषेची सद्य:स्थिती ही लेखमाला प्रकाशित झाली. ती अनेक दृष्टींनी महत्त्वाची आहे.

भाषा ही संज्ञा तेव्हा भाषा आणि साहित्य अशा व्यापक अर्थाने वापरली जात असल्याने वस्तुत: त्यांना मराठी वाङ्मयाची सद्य:स्थिती असेच अभिप्रेत आहे. ही लेखमाला हा एक आटोपशीर असा वाङ्मयेतिहासच आहे. त्यांचे बाकी उपलब्ध लेखन अगदीच अत्यल्प आहे. परंतु आहे ही कामगिरीही खूप मोलाची आहे.

आपला वाङ्मयेतिहास सिद्ध केला पाहिजे, ही जाणीव अनेकांच्या मनात इ.स.१८९८ मध्ये एकदमच उदित झालेली दिसते. मराठी साहित्याचा समावेश मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात व्हावा यासाठी न्यायमूर्ती रानडे यांनी चालवलेल्या प्रयत्नांचीही पार्श्वभूमी यामागे होती. याच वर्षी वि.ल.भावे, ल.रा. पांगारकर, न्यायमूर्ती मा.गो. रानडे आणि मोती बुलासा यांनी आपापली पावले त्या दिशेने टाकलेली दिसतात. पैकी भावे आणि पांगारकर ही नावे वाङ्मयेतिहासकार म्हणून नंतर प्रसिद्धीस आली. त्यांनी मध्ययुगीन वाङ्मय हेच आपल्या अभ्यासाचे क्षेत्र निश्चित केले होते. त्यावरील इतिहासलेखनाला त्यांनी त्याच वर्षी प्रारंभ केलेला दिसतो. न्या.रानडे यांचा या संदर्भातील इंग्रजी लेख त्याच वर्षी प्रकाशित झाला. त्यामध्ये काव्य, इतिहास, कादंबऱ्या इत्यादी प्रकारातील साठ निवडक ग्रंथांची त्यांची दिलेली यादी चर्चेला चालना देणारी ठरली. पुढे त्यांची साहित्यक्षेत्रातील कामगिरी काहीशी बाजूला पडली, ते सामाजिक-धार्मिक क्षेत्रातल्या कामगिरी-मुळेच अनेकांपर्यंत पोहोचले. मोती बुलासा हे नाव मात्र महाराष्ट्राच्या स्मरणातून पुसट होत गेले.

मोती बुलासांचा हा 'मराठी वाङ्मयाच्या सद्य:स्थितीचे संक्षेपत: अवलोकन करण्याचा' यत्न ते कितपत विकसित आहे, या प्रश्नाची तड लावण्या-साठी त्यांनी हाती घेतलेला होता. हा त्या तऱ्हेचा पहिलाच प्रयत्न आहे. अर्थात, तो आधुनिक मराठी वाङ्मयाचा पहिला इतिहास म्हणावा लागतो. मात्र प्रारंभिक ग्रंथ असूनही त्यामधून व्यक्त होणारी दृष्टी प्रगल्भ आणि आपल्या उद्दिष्टांचे नेमके भान दर्शवणारी आहे.

'वाङ्मय म्हणजे भाषेतील ग्रंथसंपत्ती' अशी सर्वांना समजण्याजोगी व्याख्या देऊन तिचे त्यांनी इंग्रजीच्या प्रभावाआधीचा व नंतरचा असे दोन विभाग केले आहेत. मराठी भाषेच्या उगमाबाबतचे प्रश्न बाजूला ठेवून मुकुंदराजांपासून ते शाहिरांपर्यंत सर्वांचा त्यांनी एक वर्ग कल्पिला आहे आणि भक्तिपरता या त्याच्या विशेषाकडे लक्ष वेधले आहे. दुसरा विभाग विषयदृष्ट्या कसा वैविध्यपूर्ण झालेला आहे, हेही त्यांनी सांगितले आहे. त्यांचे विवेचन मुख्यत्वे याच वाङ्मयाविषयी आहे. त्यांनी केलेली ही विभागणी आपण आजही तशीच करतो आहोत.

प्रस्तुत लेखमाला एकूण सात अंकांमधून सवड मिळेल तसतशी प्रकाशित झाली आहे, पण तिच्या पृष्ठांना स्वतंत्र, सलग क्रमांक दिले आहेत, त्यावरून त्याकाळी प्रचलित असलेल्या पद्धतीनुसार नंतर ती स्वतंत्र पुस्तक म्हणून काढायची असावी. ते मात्र दुर्दैवाने घडले नाही. महत्त्वाचे म्हणजे हे सर्व लेखन एक निश्चित आराखडा ठेवून झालेले आहे. केवळ ग्रंथ व ग्रंथकार यांची कालानुक्रमे माहिती असे या इतिहासाचे स्वरूप नाही. तर वाङ्मयप्रकारानुसार काव्य, नाटक, कादंबरी अशा विविध प्रकारांची चर्चा मोती बुलासा यांनी केली आहे. ती करतानाही त्या त्या प्रकाराची निदान कामचलाऊ का होईना पण व्याख्या ते करतात आणि ती तशी आहे हेही ते स्पष्ट सांगतात. पुढे ठळक कलाकृती आणि लेखक-कवी यांची ते नोंद घेतात आणि महत्त्वाचे म्हणजे त्यातील प्रवृत्ती-प्रवाह दर्शवून त्याविषयी आपला अभिप्रायही नोंदवतात. शिवाय, केवळ ललित वाङ्मयापुरता विचार मर्यादित न ठेवता इतिहासग्रंथ व शास्त्रीय वाङ्मयासारख्या प्रकारांचाही परामर्श त्यांनी घेतलेला आहे. समीक्षा, नियतकालिके, प्रकाशनव्यवहार यासारख्या साहित्यव्यवहाराशी संबंधित विविध क्षेत्रांचाही विचार त्यांनी केला आहे, यावरून त्यांच्या दृष्टीचा व्यापक परीघ ध्यानात येतो.

मोती बुलासांनी काही प्रवृत्तींवर केलेले भाष्य त्यांच्या विश्लेषक बुद्धीची साक्ष देणारे आहे. त्या काळी इंग्रजी नाटक-कादंबऱ्यांना भारतीय पेहराव चढवून ती रूपांतरे मराठीत आणण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर चालू होता. त्यातून निर्माण होणाऱ्या हास्यास्पदते-कडे लक्ष वेधताना भाषांतराचा हेतू केवळ मनोरंजन हा नसतो, तर मूळ ग्रंथकाराचे हृद्गत समजावून देण्यासोबतच मूळ भाषिक समाजाची माहिती होणे हाही असतो, हे ते ध्यानात आणून देतात. स्वतंत्र नाटकांची जी रचना होत होती, तिच्या वेगवेगळ्या तऱ्हांकडे लक्ष वेधतात.

नाट्यसंहिता आणि प्रयोग यांचा ते वेगवेगळा विचार करतात असे दिसते. या लेखमालेत नसलेला परंतु संबंधितच असा 'आमच्या नाटकमंडळ्या' हा लेखही त्यांनी लिहिला आहे. प्रयोगांच्या विचारासाठी त्यांनी तो स्वतंत्रपणे लिहिला आहे. त्यात संगीत नाटकांच्या ऐन लोकप्रियतेचा तो काळ असूनही त्यापासून होणारे तोटे ते स्पष्टपणे सांगतात. ''कै. अण्णासाहेब किर्लोस्करांनी संगीत नाटकांकडे लोकांची रुची लावल्यापासून महाराष्ट्रात जिकडे तिकडे संगीत काही विलक्षणच बोकाळले होते. शेवटी संगीताची मजल पाटणकरांच्या ('विक्रम-शशिकला'कर्ते माधवराव)

# सुवर्णमहोत्सवाची फळे

## **आल्हाद गोडबोले** (संपादक 'प्रहार')

मराठी माणसाचे (मुंबईसह) संयुक्त महाराष्ट्र राज्य १ मे, १९६० रोजी अस्तित्वात आले, त्याची एक जिवंत खूण मलबार हिलवरील राजभवनाच्या आवारात आहे. संयुक्त महाराष्ट्राची घोषणा केल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी या मंगल प्रसंगाची आठवण म्हणून राजभवनाच्या आवारात वृक्षारोपण केले. हे रोपटे आता पन्नास वर्षांचे झाले असेल.

महाराष्ट्राच्या किती धुरीणांना या वृक्षाची माहिती असेल, कोणास ठाऊक! पण लहानपणी आजीने सांगितलेली म्हाताऱ्याची गोष्ट त्यांच्या स्मरणात असावी. नसेल तर या निमित्ताने त्याची आठवण करून द्यायला हवी. एक म्हातारा असतो. त्याचे भलेमोठे घर नातवंडे-पतवंडे यांनी भरलेले असते. लौकिक अर्थाने कृतार्थ असे जीवन. आता कोणासाठी कष्ट करण्याची त्याला काही गरज नसते. हवे ते सारे मिळालेले असते. तरीसुद्धा आपल्या बागेत तो रोज खूप वेळ मशागत करत असते. नुकत्याच उगवलेल्या एका आंब्याच्या रोपाची तो खूप काळजीपूर्वक निगराणी करत होता. ते पाहून शेजाऱ्याने त्याला विचारले, 'बाबा, या झाडाला आंबे येईपर्यंत तू जिवंत राहण्याची सुतराम शक्यता नाही. तरीपण का एवढा घाम गाळतो आहेस त्यासाठी?'

झारी खाली ठेवत म्हातारा म्हणतो, 'अरे, मी याला खतपाणी घालून वाढवले, तर माझ्याच नातवंडांना त्याची फळे मिळतील. हे मी माझ्यासाठी नव्हे, त्यांच्यासाठी करतो आहे.'

राजभवनातील 'संयुक्त महाराष्ट्राच्या वृक्षा'ची फळे मंत्रालयापासून ग्रामपंचायती-पर्यंतच्या असंख्य नातवंडांनी आजवर खाल्ली. यापुढेही खात राहतील. पण महाराष्ट्राच्या पुढच्या पिढ्यांसाठी आपणही काही झाडे लावायला हवीत, याचे भान किती जणांनी दाखवले?

महाराष्ट्राचा सुवर्णमहोत्सव साजरा होत असताना हाच प्रश्न मनात येऊन गेला.

नकाशा दोन स्वरूपांचा असतो. एक स्वाभाविक किंवा नैसर्गिक आणि दुसरा राजकीय. यापैकी स्वाभाविक नकाशा, म्हणजे त्या-त्या प्रदेशाची भौगोलिक जडणघडण; ती निसर्गनिर्मित असते. म्हणजे सह्याद्रीपासून विंध्य पर्वतापर्यंतचे दखखनचे पठार, कोकणची किनारपट्टी, नद्या, जंगले, खनिजे इत्यादी. त्यात माणसाचे कर्तृत्व काही नसते. दुसरा 'राजकीय' नकाशा मात्र माणसाने घडवलेला असतो. गावे, पिके, कारखाने, धरणे, खाणी, पर्यटनस्थळे, राजधानीसह इतर शहरे, रेल्वे, रस्ते इत्यादी खुणा 'राजकीय' नकाशात दाखवल्या जातात.

देशाचा, राज्याचा, शहराचा 'राजकीय' नकाशा घडवण्याचे सामर्थ्य फक्त सत्ताधाऱ्यांमध्येच असते, असे नाही. अर्थ, उद्योग, कला, शिक्षण आदी क्षेत्रांमधील

---

**(पान ३ वरून)**

छकडीपर्यंत आली. ज्या नाटकात संविधानक नाही, भाषासौंदर्य नाही, उच्च मनोवृत्ती उत्पन्न करणारे किंवा वाढविणारे प्रवेश ज्याच्यात क्वचितच दृष्टीस पडतात, अशा नाटकांना मोठमोठ्या शहरी शेकडो प्रेक्षक मिळावे; तेही सुशिक्षित वर्गापैकी हे एकदंर समाजाच्या अध:पतित मनोवृत्तीचे आणि रुचीचेच उदाहरण नव्हे काय?'' असा त्यांचा अभिप्राय आहे. लोकांची अभिरुची घडवणे ही वर्तमानपत्रकर्त्यांची जबाबदारी असल्याने त्यांनी प्रत्येक नाटकाबाबत आपला अभिप्राय दिला पाहिजे हे मोती बुलासा यांचे म्हणणे, त्यांच्यामध्ये समीक्षक आणि लोकशिक्षक या दोन्ही भूमिका कशा एकवटल्या होत्या, यावरच प्रकाश टाकते.

निबंधवाङ्मय व इतिहासग्रंथांचाही त्यांनी साक्षेपाने परामर्श घेतलेला दिसतो. हे करत असताना चिपळूणकरांच्या लेखनातील सामर्थ्यस्थळे दर्शवून त्यांच्या लेखनशैलीची मोहकता काही वेळा घातकही ठरते, असे ते सांगतात. मोती बुलासांची गुणग्राहकता आणि सौम्यपणे तरी स्पष्टपणे समाजविघातक वाटणाऱ्या गोष्टींना विरोध करण्यातली तत्त्वनिष्ठा यांचाच प्रत्यय यातून येतो. शास्त्रीय वाङ्मय, भूगोल, ज्योतिर्गणितादि विषयांवरील ग्रंथ यांचाही त्यांनी साक्षेपाने परामर्श घेतला आहे. ''पण सर्व संस्कृतमय असल्यामुळे निव्वळ मराठी वाचकास पोपटास ज्याप्रमाणे नारळ त्याप्रमाणे आहे.'' हा एका पुस्तकावरचा त्यांचा अभिप्राय या प्रकारातील लेखनाविषयीच्या अपेक्षा स्पष्ट करणारा आहे.

एकूण ही लेखमाला खरे तर मुळातून वाचावी अशी आहे. त्या काळातील उपलब्ध सामुग्री आणि विचारव्यूह यांच्या काही मर्यादा या लेखनालाही आहेत. परंतु एकंदरीत आधुनिक वाङ्मयाचा इतिहास अभ्यासू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंना आरंभीचा टप्पा समजावून घेताना मोती बुलासांना विसरून चालणार नाही हे निश्चित.

**- डॉ.विद्यागौरी टिळक**
प्राध्यापक, मराठी विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे.

अनेक कर्तबगार व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने तो घडवत असतात. महाराष्ट्राच्या १९६० आणि २०१० अशा दोन्ही वर्षांच्या नकाशावर नजर टाकली, तर काय दिसते?

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश यांसारख्या मोठ्या राज्यांचे विभाजन झाले, तसे महाराष्ट्राचे झाले नाही. त्याच्या सीमा पन्नास वर्षे अबाधित राहिल्या. 'संयुक्त महाराष्ट्र' लढ्याच्या पाठीराख्यांना मात्र एक खंत बोचत राहिली. पूर्वीच्या मुंबई प्रांतात असलेल्या बेळगाव, विजापूर, कारवार, धारवाड जिल्ह्यांसह मराठीभाषक सीमाभाग महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात यावा, ही मागणी तब्बल अर्धशतक आंदोलनापुरतीच राहिली. तरीसुद्धा स्वतंत्र विदर्भवाद्यांच्या मागणीला पुरेसा जनाधार आणि राजकीय पाठिंबाही न मिळून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र ५० वर्षे आहे तसाच राहिला हे महत्त्वाचे.

बेसुमार जंगलतोड आणि अतिक्रमणे यामुळे वृक्षाच्छादित प्रदेश आक्रसला. तसेच कोयनानगर, उज्जनी, जायकवाडी यांसारख्या धरणांमुळे जलाशयांचे क्षेत्रफळ आणि पाण्याखालची जमीन वाढली, तरी भूगर्भांतर्गत पाण्याचे साठे जवळजवळ संपत आले. असे किरकोळ बदल वगळता महाराष्ट्राचे 'स्वाभाविक चित्र' मात्र गेल्या ५० वर्षांत तसेच राहिले.

महाराष्ट्र राज्य स्थापन झाले, तेव्हा ब्रिटिशांनी बांधलेल्या पहिल्या मुंबई-ठाणे-पुणे रेल्वेची शताब्दी होऊन गेलेली होती. मात्र महाराष्ट्राच्या रौप्यमहोत्सवानंतरही कोकणात रेल्वे आली नव्हती. सुवर्णमहोत्सवापूर्वी ती सर्वार्थाने रुळावर आली! तरीही ती दुहेरी असावी, यासाठी अजूनही प्रयत्न केले जात नाहीत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील रेल्वेचे जाळे विस्तारण्यासाठी या अर्धशतकात पुरेसे प्रयत्न झाले नाहीत, याचे अपश्रेय आजवरच्या लोकप्रतिनिधींना स्वीकारावेच लागेल.

रस्त्यांच्या जाळ्याबाबत महाराष्ट्राने चांगली कामगिरी बजावली. देशातील पहिला 'एक्सप्रेस-वे' मुंबई-पुणे दरम्यान बांधला गेला, हे गौरवास्पद आहेच. देशातील इतर राज्यांपेक्षा, अगदी खेडोपाडी 'एसटी'चा लाल डबा पोचवण्याच्या रस्त्यांचे जाळे त्या आधीच राज्यभर विणले गेले होते. 'गाव तिथे रस्ता आणि रस्ता तिथे एसटी' हे सूत्र प्रत्यक्षात उतरवणाऱ्या सर्वांना त्याचे श्रेय द्यावे लागेल.

मोठे उद्योग, धरणे आणि वीजप्रकल्प ही भारताची आधुनिक तीर्थक्षेत्रे मानणाऱ्या पं. जवाहरलाल नेहरूंचा दृष्टिकोन यशवंतराव चव्हाण यांनीही स्वीकारला. त्यामुळे कोयनानगरसारखे प्रकल्प महाराष्ट्रात उभारले गेले. कृष्णा आणि गोदावरी या मुख्य नद्या पुढे शेजारच्या कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या राज्यांमधून वाहत जातात. या नद्यांच्या पाण्यावरील हक्क आणि त्याचे वाटप हा याच अर्धशतकात वादाचा विषय झाला. त्यात महाराष्ट्राच्या वाट्याला येणारे सर्व पाणी अडवण्याच्या क्षमतेची धरणे मात्र आपण पूर्ण करू शकलो नाही.

राज्यकर्त्यांकडे दूरदृष्टी नसेल तर त्याचे परिणाम भावी पिढ्यांना कसे भोगावे लागतात हे कृष्णा पाणीवाटपाच्या संदर्भात यापुढील काळात दिसून येईल. जमिनीतील पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे विहिरी कोरड्या पडत गेल्या, कालव्याच्या पाण्यावर अवलंबून राहण्याचे प्रमाण वाढले, उसासारखी बागायती शेती वाढल्याने तेही कमी पडू लागले. शेतीला प्राधान्य नसल्याने गावोगावचे रहिवासी स्थलांतरित होऊन शहरीकरण वाढत गेले. जमिनी पडीक झाल्या आणि खेडी ओस पडू लागली. मात्र पाण्याचा वापर आणि मागणी यांचे प्रमाण दिवसेंदिवस व्यस्त होत गेले. एकविसाव्या शतकात पाण्याचे दुर्भिक्ष्य खूपच वाढणार आहे. पडणाऱ्या पावसाचे जास्तीत जास्त पाणी अडवण्याबाबत महाराष्ट्राने आजवर केलेली हयगय शताब्दीपर्यंत किती गंभीर वळणापर्यंत राज्यास घेऊन जाईल, याची कल्पना करणेही कठीण आहे.

किर्लोस्करांनी नांगराचा पहिला कारखाना, राहुल बजाज यांनी स्कूटरचा पहिला कारखाना किंवा जे.आर.डी. टाटांनी पहिली विमान कंपनी आणि पहिले तारांकित ताज हॉटेल महाराष्ट्रात सुरू केले, हे मराठी माणसाचे खरोखरीच भाग्य. अशा साहसी उद्योजकांनीच आज 'औद्योगिकदृष्ट्या प्रगत' असा लौकिक मिळवलेल्या महाराष्ट्राचा पाया घातला. महाराष्ट्र अस्तित्वात आला, तेव्हा किर्लोस्करवाडीपासून मुंबई-पुण्यापर्यंत उद्योगवाढीसाठी अनुकूल वातावरण तयारच होते. सुरुवातीच्या दोन-तीन दशकांत आपल्या राज्याची औद्योगिक भरभराट होण्याच्या दृष्टीने त्याचा चांगला उपयोग झाला. महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर औद्योगिक प्रगत राज्य बनले. मात्र आर्थिक उदारीकरणानंतर, म्हणजे गेल्या दोन दशकांत बदललेल्या वाऱ्याच्या दिशेचा आणखी लाभ उठवत, इतर राज्यांना स्पर्धेत मागे टाकून, आघाडीवर राहणे महाराष्ट्राला शक्य झाले नाही. आज गुजरातपासून तामिळनाडूपर्यंत अनेक राज्यांनी महाराष्ट्रापेक्षा अधिक औद्योगिक प्रगती साध्य केली आहे. 'एमआयडीसी'सारखे उद्योगांना चालना देणारे उपक्रम महाराष्ट्रात ज्या प्रभावीपणाने राबवले गेले, ते सातत्य न टिकल्यामुळे असेल, लाल फितीच्या आणि भ्रष्ट कारभारामुळे असेल किंवा उद्योग बंद करून जमिनी विकण्याच्या आणि टॉवर्स उभारून पैसा कमावण्याच्या उद्योजकांच्या मतलबीपणामुळे असेल, महाराष्ट्राचा औद्योगिक प्रगत चेहरा ऐन सुवर्ण-महोत्सवाच्या पूर्वसंध्येला कळाहीन बनला, हे नाकारता येत नाही. त्यामागील वीजटंचाईचा अंधार तर अस्वस्थ करणारा आहे.

मुंबई ही आर्थिक राजधानी, तशीच ती कापड-गिरण्यांमुळे प्रसिद्ध बनलेले महानगर. मात्र दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखालील अभूतपूर्व संपामुळे १९८३ नंतर गिरण्याच बंद पडल्या आणि सुमारे


अडीच लाख गिरणीकामगार देशोधडीला लागले. आज गिरण्यांच्या जमिनीवर उभे राहत असलेले चकाचक टॉवर्स, कॉर्पोरेट ऑफिसेस, मॉल्स, मल्टिप्लेक्स हे मुंबईची ‘शान’ बनत असले तरी महाराष्ट्रातील बदलाचे ते प्रातिनिधिक चित्र आहे, हे विसरता येत नाही.

महाराष्ट्राचा चेहरामोहरा पन्नास वर्षांत कसा कसा बदलत गेला, याचे असे अनेक दाखले देता येतील. शिर्डीपासून बॉलिवूड-पर्यंत आणि राळेगणसिद्धीपासून बारामती-पर्यंत अध्यात्म, मनोरंजन, ग्रामसुधार, कृषिउद्योग आदी क्षेत्रांत ‘मॉडेल्स’ उभी राहिली, तीही याच अर्धशतकात. उदारीकरणापूर्वीच्या समाजवादी समाज-रचनेच्या काळात सहकार चळवळ चहुबाजूंनी बहरली ती महाराष्ट्रात आणि दुष्काळात सामान्य माणसाला जगण्यासाठी आधार दिलेली, पुढे संपूर्ण देशाने राबवलेली ‘रोजगार हमी योजना’ ही देखील महाराष्ट्राचीच देणगी. मराठी भाषकांनी अभिमान बाळगावा, असा ‘विश्वकोश’ प्रकल्प महाराष्ट्राचा आणि ‘आयुका’सारखे वैज्ञानिक तीर्थक्षेत्रही महाराष्ट्राचेच. हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, रयत शिक्षण संस्था, आनंदवन यांसारख्या अभिमानास्पद संस्था उभ्या करणारे महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, बाबा आमटे असे एकांडे शिलेदार महाराष्ट्राचेच आणि तमाम मराठी माणसाचे एकजिनसीपण दाखवणारे गणेशोत्सव-साहित्यसंमेलनासारखे समूह मेळावे आणि पंढरीची वारीही महाराष्ट्राचीच.

महाराष्ट्राचा सुवर्णमहोत्सव साजरा करताना या सर्व मानबिंदूंची आपण उजळणी करतो/केली. ती जरूर करावी. जमाखर्चाचा ताळेबंदच मांडायचा झाला, तर पन्नास वर्षांत आपण बरेच पुढे आलो, असे समाधानही करून घेता येईल. प्रश्न असा, की इतिहासापेक्षाही भावी काळातील महाराष्ट्राचे चित्र उजळ आणि अधिक देखणे रेखाटण्यासाठी या संचिताचा योग्य वापर करण्याची क्षमता असलेले नेतृत्व आणि लोकप्रतिनिधी याच मातीत निपजतात का? वर म्हटल्याप्रमाणे बाबा आमटे किंवा अण्णा हजारे हे स्वकष्टाने नंदनवन निर्माण करणारे शिल्पकार आहेत. त्यांच्यासारख्यांनी काही उभे केले, म्हणून महाराष्ट्राचा वेगळा नकाशा उभा राहावा, हे चांगलेच आहे. परंतु त्यापेक्षा अधिक जबाबदारी या राज्याचे सुकाणू ज्यांच्या हाती सोपवलेले असते, त्या लोकप्रतिनिधिंची आणि नेत्यांची असते. त्यांनी अजिंठा-वेरुळसारखी लेणी कोरावीत अशी अपेक्षा नाही. पण वांद्रे-वरळी सी-लिंक किंवा अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळाच फक्त उभारून संगमरवरी पाट्यांवर आपली नावे कोरून ठेवावीत, असेही नाही.

महाराष्ट्राकडे सह्याद्री आहे, तशी उदंड जमीन आहे. त्यातून उगवलेली रोपटी आहेत, तसे त्यांची मशागत करणारे हात आहेत. आपण पन्नाशी गाठली, आपले पोट भरले, असा विचार करून आणखी पन्नास वर्षांनी भरपूर आंबे देणाऱ्या वृक्षांकडे दुर्लक्ष करण्यात आपल्याच भावी पिढ्यांचे नुकसान आहे. यशवंतराव चव्हाणांनी दूरदृष्टी दाखवून जी पायाभरणी केली, तीच परंपरा यापुढील पन्नास वर्षांत पाळली गेली, तरच भविष्यकाळ सोनेरी होईल. अन्यथा वीजकपातीच्या अंधारातच महाराष्ट्र चाचपडत राहील!

**आल्हाद गोडबोले**
alhadgodbole@gmail.com




# असाही महाराष्ट्र

## संदेश भंडारे

संदेश भंडारे यांच्या छायाचित्रांचं विचारप्रवर्तक पुस्तक. मध्यमवर्गीय कक्षेबाहेरचा एक मोठा समाज त्यातून मूर्त झालेला आहे. सर्वसाधारण शहरी माणसाच्या विचारापलीकडचा महाराष्ट्र इथे साकार झाला आहे...

वसंत आबाजी डहाके यांची प्रस्तावना त्याचे महत्त्व विशद करते.

**मूल्य ३५० रुपये**

**सवलतीत २०० रुपये**

# साहित्याचे प्रयोजन

## दिलीप चावरे

महाराष्ट्रासाठी, मराठी भाषेसाठी हाकेसरशी एकत्र येणारा मराठी माणूस आज गोंधळल्यासारखा चाचपडत आहे. जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था यांनी निर्माण केलेल्या स्पर्धेच्या वातावरणात मराठी तरुण अभावानेच चमकत आहे. अमेरिकेतली सिलिकॉन व्हॅली पादाक्रांत करणारा मराठी बाणा आपल्या मायभूमीतच गळपटून का जातो? त्याच्या कर्तृत्वाला, प्रतिभेला इथे घुसमटल्यासारखे का वाटते? उपक्रमशील महाराष्ट्रात असे घडणे शोचनीय आहे. इतिहासाचे पुनर्विलोकन करून त्यापासून धडा न घेतल्यास प्रगतीची कवाडे बंद होतात. त्याचबरोबर मनुष्य प्राणी एखादी कृती कैफाच्या भरात हातून घडून गेल्यानंतर स्वत:च तिचे विश्लेषण करणार नसेल तर त्याचाही विकास होऊ शकत नाही. थोरामोठ्यांची आत्मकथने या दृष्टीने पथदर्शक ठरू शकतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचा भूतकाळ आणि भविष्य यांचा वेध घेण्याचा हा लेख एक प्रयत्न आहे.

ज्येष्ठ सर्वोदयी नेते अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचे 'माझी घडण' हे आत्मकथन प्रथम १९५७ मध्ये प्रसिद्ध झाले. त्याची दुसरी आवृत्ती १९६३ साली तर 'सुधारीत' आवृत्ती १९८२ साली साधना ट्रस्टने प्रसिद्ध केली. यातील मजकूर अण्णासाहेबांच्या कथनावर आधारीत आहे. अण्णासाहेबांचा जन्म ७ ऑक्टोबर १८९७ रोजी तर निधन ११ मार्च १९८० रोजी झाले. त्यांचे संपूर्ण जीवन समाजासाठी होते. निरीच्छ, निर्लोभी आणि निरामय आयुष्य ते जगले. पंडित नेहरूंशी त्यांची जवळीक होती. हवे ते अण्णांना मिळू शकले असते पण स्वत:साठी त्यांनी काही मागितले नाही. एक प्रकारे सेनापती बापटांचे उत्तराधिकारी असे त्यांना म्हणता येईल. त्यांचे वर्णन करण्यासाठी आचार्य विनोबा भावे यांनी पुढील श्लोक लिहिला होता –

अंत्योदयो भिक्रमश्च<br>
सामूह्यम् संविभाजनम् ।<br>
तज्ज्ञत्वं कार्यकर्तृणाम्<br>
एतदण्णा विचारणा ।।

(सर्व कार्यक्रमांच्या मुळाशी समाजाच्या तळागाळातल्या माणसांच्या विकासाचा विचार असला पाहिजे.)

तत्कालीन राजकीय घडामोडींचे अण्णा जवळचे साक्षीदार होते. महात्मा गांधींचा त्यांच्यावर विशेष लोभ होता. अण्णांनी या सर्व काळाबद्दल आणि तेव्हाच्या नेत्यांबद्दल स्पष्ट शब्दांत विवेचन केले आहे. काँग्रेस, कम्युनिस्ट आणि समाजवादी (म्हणजे सोशालिस्ट) आदींबाबत परखड मतप्रदर्शन केले आहे. महाराष्ट्रात काँग्रेसची सत्ता अबाधित का राहिली याचे गुह्य अण्णांच्या स्वकथनातून उघड होते. त्या अनुषंगाने उपस्थित होणारे काही प्रश्न आणि सद्यस्थिती यांचा ऊहापोह करणे हा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे.

अण्णा म्हणजे निष्काम कर्मयोगी. मात्र समाजाने त्यांना देव्हाऱ्यात बसवले. नेतृत्व करणारा मनुष्यप्राणीच असतो. त्यालाही मानवी भावना, विकार असतात ही बाब समाज नजरेआड करतो. जे नेते संसारी बनतात, त्यांना उतारवयात सुना-जावई-नातवंडे असा विरंगुळा लाभू शकतो. मात्र जे अविवाहित राहतात, त्यापैकी अनेकांची अवस्था दारुण होत जाते. आयुष्यभर निष्कांचन राहिल्यामुळे आप्तजनांनाही त्यांच्याबद्दल फारशी माया नसते. इतरेजन एखादे भाषण अथवा जयंतीमयंतीपुरतेच त्यांच्या संपर्कात राहतात. दैनंदिन आयुष्य एकट्याने व्यतीत करणेच अशा नेत्यांच्या नशिबी येते. याबाबतीत अण्णा सुदैवी असले तरी अशा अवस्थेचे त्यांनी मोठे बोलके वर्णन 'माझी घडण'मध्ये केले आहे. त्यातील काही भाग अनेकांना अविश्वसनीय, धक्कादायकही वाटू शकेल. अण्णांचे मोठेपण म्हणजे त्यांनी घडले ते तसेच सांगितले आणि ते लिखित स्वरूपात समाविष्ट करण्यास संमती दिली.

एके ठिकाणी अण्णा म्हणतात, ''ज्या गोष्टींवर माझी श्रद्धा नव्हती अशा काही गोष्टी माझ्याकडून घडत आहेत. उदाहरणार्थ रुद्राक्ष वापरणे, रिद्धपूरच्या गुलाबबाबांच्या दर्शनाला जाणे, इतर संतपुरुषांच्या दर्शनास जाणे वगैरे. याबद्दल माझ्या मित्रांना व परिचितांना वाटते, हे परिवर्तन कसे झाले? याबद्दल मला एवढेच सांगावयाचे आहे की माझ्यावर ज्यांचे प्रेम व श्रद्धा आहे; त्यांच्या समाधानासाठी मी या गोष्टी करत गेलो.''

अण्णांची ही कबुली बोलकी आहे. सर्वसामान्य माणूस देवळात गर्दी करतो किंवा महाराज-बुवा यांच्या नादाला लागल्याबद्दल त्यांच्यावर टीका करणे सोपे असते. अण्णांवर टीका करणारा स्वत:ही तसाच अधिकारी असला पाहिजे.

साहित्य आणि समाज, साहित्य आणि जीवन यांचे नाते कसे असावे हा एक सनातन प्रश्न आहे. ''साहित्यासाठी साहित्य की जीवनासाठी साहित्य?'' (कलेसाठी कला?) असल्या विषयांवर एकेकाळी महाराष्ट्राच्या साहित्य जगतात कडाक्याचे वाद झडत. काही पराकोटीस

जात. आज मराठी साहित्यिक असल्या चर्चा करण्याच्या फंदात पडत नाहीत. त्यांच्या चर्चा असतात निराळयाच विषयांवर. असो. तथापि एखाद्या मराठी साहित्यकृतीचा प्रभाव समाज जीवनावर पडला आहे अथवा एखादा ज्वलंत सामाजिक प्रश्न घेऊन त्यावर साहित्यनिर्मिती झाली आहे असेही ठळक उदाहरण दाखवता येणार नाही. आजही आपण 'रणांगण' ही कादंबरी, मर्ढेकरांच्या कविता, गाडगीळांची कथा अशाच विषयांवर चर्चा करण्यात रमतो. हे सारे साहित्यिक आणि त्यांच्या साहित्यकृती यांचे आगळेवेगळे स्थान अबाधित राहणारच आहे. परंतु त्यानंतर तेवढ्याच दमाचे साहित्य का नाही निर्माण झाले? जसे राजकारणात यशवंतराव चव्हाणांचे नाव घेतल्यानंतर पूर्णविराम तसे मराठी साहित्याचे झाले आहे काय? महाराष्ट्राची सर्वसाधारण पीछेहाट आणि मराठी साहित्याची अधोगती यांची संगती कुठे लागू शकते का? समाजात चाललेल्या परिवर्तनास गवसणी घालण्याच्या कामी मराठी साहित्य थिटे पडत आहे का? मराठीची गळचेपी चालू आहे, भाषेकडे दुर्लक्ष होत आहे असा टाहो फोडणारे अनेक आहेत. त्यांचे प्रयत्न स्तुत्य असले तरी आपल्या सर्व आकांक्षा त्यांनी शासनावरच केंद्रित केल्यास तेसुद्धा अयोग्य ठरेल. प्रत्यक्ष कृती करणारेच काहीतरीच साध्य करू शकतात. या दृष्टीने दिनकर गांगल आणि त्यांच्यासमवेत असणाऱ्या मराठीप्रेमींनी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यांच्यामागे सर्व शक्ती एकवटणे युक्त होईल. अनेकांनी स्वतंत्र प्रयत्न करण्यापेक्षा पुष्कळांनी संघटित प्रयत्न करणे अधिक फलदायी ठरणार आहे. हा मुद्दा येथे उपस्थित करण्याचे प्रयोजन असे की कोणतेही आंदोलन अथवा चळवळ पुढे नेण्याचे मार्ग सर्वसामान्यांना झेपत नाहीत. अण्णांनी याबाबत मुळशी लढ्याबद्दल केलेले विवेचन मुळातूनच वाचण्यासारखे आहे. या लढ्याला वर्तमानपत्रांनी दिलेले गोंडस रूप आणि त्या भागातील वस्तुस्थिती यांच्यात भयानक तफावत होती. आजच्या समस्यांना ते कितपत लागू पडते?

मुळशी येथे टाटा कंपनी बांधणार असलेल्या धरणाविरुद्ध पांडुरंग महादेव बापट यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह सुरू झाला. धरणाखाली ५२ गावांची हजारो एकर जमीन जायची होती. बापट मूळचे टिळकवादी. बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण त्यांनी घेतलेले होते. नंतर ते गांधीवादी झाले. 'लढाई, संघर्ष हेच त्यांचे जीवन होते. संघटनाशक्तीही फार मोठी होती' असे अण्णा म्हणतात. हा लढा चालवण्यासाठी स्थापन झालेल्या मुळशी पेटा सत्याग्रह सहाय्यक समितीचे अण्णा सेक्रेटरी होते. प्रत्यक्ष लढ्यात उतरायचे नाही असा बापट यांचा हुकूम होता.

अण्णा म्हणतात, ''(धरणविषयक) प्रश्नांची मीमांसा ते (बापट) फारशी करत नसत. सर्व लढा भावनात्मक पातळीवर भर देऊन चालू होता. अनेक ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांना धरणविरोध मान्य नव्हता. उलट, शेती सुधारण्यासाठी धरणे हवीत असे स्पष्टच होते. मात्र हा स्थानिक प्रश्न भावनात्मक पातळीवर इतका उग्र बनला की या लढ्याला विरोध करण्याची शक्यताच उरली नाही. जनतेचे सर्व लढे एका अर्थी बुद्धिनिष्ठेपेक्षा अशा भावनात्मक पातळीवरच उभे असतात. 'जान देऊ पण जमीन देणार नाही' ही या चळवळीची घोषणा होती... हा सत्याग्रह झाल्याने चार कोटी रुपये नुकसानभरपाई तरी मिळाली. स्थानिक मजुरांना प्राधान्याने घ्यावे असाही ठराव झाला.... अशा योजना आखताना स्थानिक जनतेचे हक्क असतात ही तरी जाणीव झाली. लोकजागृती, संघटित शक्तीची जाणीव शेतकऱ्याला आली. हा माझ्या मते या लढ्याचा मोठा विजय होता'', असे अण्णा स्पष्ट करतात.

या लढ्यानंतर बापटांना 'सेनापती' हे बिरूद जनतेने बहाल केले. ज्या शेतकऱ्यांसाठी सेनापती लढले त्यांचे पुढे काय झाले? अण्णा म्हणतात, ''आमचा खरा पराभव पुढेच झाला. या पैशांचे (४ कोटी रुपये) काय झाले? खेड्यांतून काँग्रेसला भरभक्कम पाठिंबा मिळाला, पण जोडीला दारूचे गुत्ते वाढले. जमिनीच्या कज्जेदलाल्या वाढल्या. वकिलांची वकिली चांगली वाढली. सिनेमा व तमाशा थिएटरे वाढली. सारा पैसा व्यसनात उडून गेला. तो उत्पादक कामात व जमिनीला पाणी घेण्यासाठी वापरला गेलाच नाही. आजही तीच स्थिती बव्हंशी आहे.''

मुळशी सत्याग्रह त्या काळातील मोठी घटना म्हणता येईल. त्यानंतर दुसरे महायुद्ध सुरू व्हायची लक्षणे दिसू लागली. सशस्त्र क्रांती, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, साम्यवाद, काँग्रेसची संपूर्ण स्वराज्याची मागणी या साऱ्या मोठ्या घडामोडी परस्परसंबंधी होत्या. मात्र त्यापैकी अगदी तुरळक घटनांचा पडसाद आपल्याला मराठी साहित्यात आढळतो. महायुद्ध संपले अन् स्वातंत्र्यप्राप्ती झाली. पण मराठीत या विषयावर किती लिखाण आहे? आत्मचरित्रे, चरित्रे आणि आठवणी अशा स्वरूपातच फुटकळ लिखाण झाले. संयुक्त महाराष्ट्राचा लढा लालजी पेंडसे आणि य.दि. फडके यांनी अस्सल ऐतिहासिक साधनांचा वापर करून शब्दरूप केला. या विषयावर ना आले एखादे नाटक ना चित्रपट. उत्तम विषय हेरून तो अजरामर करण्याचे कौशल्य दोनच मराठी माणसांनी दाखवले असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये. व्ही. शांताराम यांनी मराठी मातीतले विषय जागतिक स्तरावर नेले. आचार्य अत्रे यांनी 'श्यामची आई' हा सर्वांगसुंदर चित्रपट बनवला. त्यास राष्ट्रपतींचा पहिलावहिला सुवर्ण पुरस्कार लाभला. इतर दिग्दर्शक आणि निर्माते - काही अपवाद वगळता - शिवकाल आणि पेशवेकाल (लावणी-तमाशा) यांच्या पकडीतून मुक्त होऊ शकले नाहीत. अपवादच करायचा असे ठरवले तर चीनबरोबरच्या युद्धाच्या वेळी काही प्रतिष्ठाप्राप्त कवींनी राष्ट्रकर्तव्य म्हणून चार-दोन कविता पाडल्या. तेवढाच वर्तमानाशी

मराठी साहित्याचा संबंध. सुदैवाने गेल्या काही वर्षांत चित्र बदलू लागले आहे. परंतु त्यातूनही मराठी साहित्याचा उणेपणाच उघडा पडतो. समीक्षा करावी फक्त महाविद्यालयीन व्याख्यात्यांनीच असा एक गैरसमज आहे. तसाच मराठी साहित्य जागतिक दर्जाचे असल्याचा दावा म्हणजे भ्रमाचा भोपळा होय.

गेल्या ५० वर्षांतील साहित्यनिर्मिती पाहता अनेक प्रमुख विषय साहित्यिकांनी आपल्या कक्षेबाहेर ठेवल्याचे जाणवते. आधी म्हटल्याप्रमाणे काही चरित्रे-आत्मचरित्रांचा अपवाद सोडून. दहशतवाद, अंतर्गत सुरक्षा, धर्मवाद आणि जातवाद, भ्रष्टाचार आणि महागाई, विकास आणि प्रगती असे विषय मराठीत अभावानेच वाचायला मिळतात. संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य होईपर्यंत स्वाभाविकच अन्य विषयांना कमी महत्त्व मिळणे अपेक्षित होते. परंतु त्यानंतर काय? काही दलित आत्मकथने प्रकाशित झाली आणि आपल्याच कोषात मग्न मराठी साहित्यिक खडबडून जागे झाले असे म्हटले जाते. हे कितपत खरे आहे? कुशी बदलून पुन्हा झोपी जावे असे मराठी साहित्यिकांच्या बाबतीत घडले असे सामान्यपणे म्हणता येईल. प्रत्यक्ष लोकांच्यात काम करणाऱ्यांचे अनुभव अगदी जिवंत आणि रसरशीत असतात. त्यापैकी कितीजणांची दखल मराठी साहित्याने घेतली? सरकारवर आणि राजकारणावर टीका करण्यात, त्यांची टिंगलटवाळी करण्यातच त्यांनी स्वत:स धन्य मानले. सर्वोदयी कार्य खरे तर किती श्रेष्ठ! परंतु सर्वोदयवाद्यांबदल एवढे गैरसमज पसरवण्यात आले की हा पंथ आता जवळपास इतिहासजमा झाला आहे. आचार्य विनोबा भावे यांची भूदान संकल्पना किती उदात्त. परंतु ती महाराष्ट्राने स्वीकारली नाही. उलट सरकारी संत म्हणून त्यांची हेटाळणी करण्यात आली. कर्मवीर भाऊराव पाटलांनी खेड्यापाड्यांत शिक्षण नेले. आज शिक्षणसम्राट ही शिवी झाली आहे. सहकारी साखर कारखान्यांनी महाराष्ट्राचा ग्रामीण चेहरा बदलून टाकला. कालांतराने या संकल्पनेचाही अध:पात झाला. हे परिवर्तन आणि संक्रमण यांचा आढावा मराठीत शोधूनही सापडणार नाही. मराठी साहित्यिक या सर्व घडामोडींबद्दल उदासीन राहिला आहे. तरीही मराठी साहित्य वैश्विक पातळीचे असल्याचे वल्गना वारंवार कानी पडतेच.

अण्णांचे 'माझी घडण' हे आत्मकथन म्हणूनच मैलाचा दगड ठरण्यासारखे आहे. महात्मा गांधी ग्रामस्वराज्य आणि रामराज्य या कल्पनांचा पुरस्कार करत. 'खेड्याकडे चला' हा त्यांचा संदेश होता. त्यासंदर्भात अण्णा लिहितात-

''१९३६ला फैजपूरच्या अधिवेशनाला गांधीजीही हजर होते. प्रेक्षकवर्ग सुमारे दोन लाखांच्या वर होता आणि तरीही झाडूवाला आणि मेहेतर नसणारे हे पहिले अधिवेशन... सर्व उच्चवर्णीय व शिष्ट समाजातील तरुण स्वयंसेवक झाडूकाम व संडास सफाई ही कामे करत होती. दोन लक्ष माणसे जमली याची झिंग आम्हाला चढली. प्रत्यक्षात काय अडचणी उभ्या राहतील याची कल्पना आम्हास आली नाही. मात्र गांधीजी सावध होते. त्यांनी प्रमुख स्थानिक व महाराष्ट्रातील पुढाऱ्यांना बोलावून सांगितले, ''हा तुमचा खेड्यात काँग्रेस भरवण्याचा महान प्रयोग फारच यशस्वी झाला. याबद्दल मी तुम्हाला धन्यवाद देतो. आता लवकर आवरा. या घाणीने आजारपण आणि साथी उद्‌भवण्यापूर्वी येथून पळा.'' मग आम्हीही शुद्धीवर आलो. तीन दिवसांचे अधिवेशन दीड दिवसांत आवरले... गांधीजींच्या शहाणपणाने आणि चाणाक्षपणाने आम्ही वाचलो.''

फैजपूरचे काँग्रेस अनेक कारणांनी गाजले. मात्र त्यावर अण्णांनी वेगळ्याच अंगाने प्रकाश टाकला आहे. अण्णांच्या पुस्तकात असे संदर्भ ठायी ठायी आहेत. खादीचा आग्रह असला तरी कापड गिरण्यांना विरोध करता येणार नाही असे गांधीजी स्पष्टपणे सांगत. धरणांनाही त्यांचा विरोध नव्हता, असे अण्णांनी नमूद केले आहे. गांधीजींचे ऐतिहासिक मोलाचे चरित्र डी.जी. तेंडुलकर या मराठी माणसाने (इंग्रजीत) लिहिले. त्याची कितपत दखल मराठीत घेण्यात आली?

अण्णांचे आत्मकथन हा एक मुद्दा म्हणून विचारात घेतल्यास महाराष्ट्राच्या ५० वर्षांच्या वाटचालीचे विश्लेषण अत्यंत वेगळ्या प्रकारे करता येते. महात्मा गांधी, पंडित नेहरू आणि सरदार पटेल यांचा दीर्घ सहवास अण्णांना लाभला. राजकीय नेतृत्वगुण या तिघांकडे फार मोठ्या प्रमाणात असल्याचे अण्णा खुलेपणाने मान्य करतात. महाराष्ट्रातील आचार्य भागवत, धनंजयराव गाडगीळ, शंकरराव देव, हरिभाऊ फाटक, सानेगुरुजी आदींबरोबरही त्यांचा सतत संपर्क असे. मात्र काँग्रेस नेत्यांच्या राजकीय चाणाक्षपणाच्या पासंगालाही महाराष्ट्रातील नेते पुरणार नाहीत असा त्यांच्या विवेचनाचा एकंदर सूर आहे. आरंभी संयुक्त महाराष्ट्राबद्दल उदासीन असणारे अण्णा कालांतराने भाषावार प्रांतरचनेला अनुकूल होतात. ही सर्व आवर्तने त्यांच्या घडणीत सापडतात. परंतु मराठी साहित्यात त्या घडामोडींचे पडसाद उमटल्याचे अभावानेच जाणवते.

मराठीचा अतिरेकी अभिमान, अन्य भाषांमध्ये संभाषण-वादविवाद करण्या-बाबतची असमर्थतता, रचनात्मक कल्पनांचा अभाव आणि विकास योजनांना विरोध करण्यात धन्यता मानणारे साहित्यिक हाच महाराष्ट्राचा सांस्कृतिक परिचय होणार असेल तर पुढील ५० वर्षांतही राज्याचे चित्र फारसे बदलण्याची अपेक्षा राखता येणार नाही. साहित्य संमेलने, त्यांच्यातील क्षुद्र मानपान आणि कोषात गुरफटून राहण्याची वृत्ती जेव्हा मराठी साहित्यसृष्टी झटकून टाकेल तेव्हाच हे चित्र बदलेल.

**दिलीप चावरे**
patrakar@hotmail.com

# आचार्य अत्रे यांचा विसर दुर्दैवी

## अरविंद व्यं. गोखले

आचार्य अत्रे यांच्या निधनानंतर पहिली पंधरा–वीस वर्षे अशी गेली, की महाराष्ट्रात कोणताही गैरप्रकार घडला रे घडला की मराठी माणसाला अत्र्यांची आठवण झाल्याशिवाय राहत नसे. आज अत्रे असते तर त्यांनी काय म्हटले असते ते जाणून घ्यायला हा मराठा गडी उत्सुक असे. मग तो म्हणे, 'आज अत्रे हवे होते हो, एकेकाला त्यांनी चांगले फोडून काढले असते.' अत्रे तेव्हा हवे होते, हे तर खरेच; शिवाय अत्र्यांचा तो 'मराठा' आजही हवा होता. मुख्य म्हणजे अत्र्यांच्या लेखणीचे फटकार हवे होते. अत्र्यांची भाषणे म्हणजे मराठी भाषेचा एक अलंकार होता. अत्रे आपल्या भाषणात शिव्या देतात असा आरोप काही मराठी राजकारण्यांकडून केला जात असे. तथापि अत्रे यांचे म्हणणे असे की हरामखोरांना हरामखोर म्हणायचे नाही तर काय हरिश्चंद्र म्हणायचे? आपण काही शिमगातल्या शिव्या देत नाही, जिथे एखाद्याचा तसा उल्लेख करणे अटळ असेल तिथेच आपण तो करतो, असे ते म्हणत.

मी मूळचा सांगलीचा. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन अतिशय जोरात होते. मी अर्थातच लहान होतो. मला अत्र्यांची सभा मात्र आठवते. माझ्या वडिलांनी मला त्या सभेला नेले. ते वय अत्रे काय म्हणतात ते कळण्याचे नक्कीच नव्हते. तेव्हा पाहिलेले अत्रे मला पुढे माझ्या पत्रकारितेच्या कारकिर्दीत उपयोगी पडले. मी आठवी ते अकरावी या इयत्तांमध्ये टेक्निकलला होतो. त्यामुळेही असेल, वर्कशॉप टेक्नॉलॉजी किंवा अन्य कुठलेसे प्रॅक्टिकल असेल, तेव्हा अत्र्यांचा मराठा ही आमची मेजवानीच असे. हे पत्र येथे छापून येथे प्रसिद्ध केले इथपर्यंत त्या वृत्तपत्राचा फडशा पाडलेला असे. आमच्या घरी तेव्हा त्रिसाप्ताहिक असलेला 'केसरी' आणि त्यावेळचे एखादे स्थानिक वृत्तपत्र येत असे. आम्हा भावंडांमध्ये कोण आधी वृत्तपत्र उचलतो याची स्पर्धा लागत असे. किर्लोस्करवाडीला एकदा कॉम्रेड डांगे, रावसाहेब कळके आणि नाना पाटील यांची भाषणे होती. मी आणि माझा मित्र असे सांगलीहून सायकलीने त्या सभेला गेलो होतो. त्या सभेतली भाषणेही कळण्याचे ते वय नव्हते. नाना पाटील शड्डू ठोकून बोलले. त्यांनी त्यावेळच्या राजकारण्यांना भरपूर शिव्या दिल्या आणि टाळ्या घेतल्या. सभेला कामगारांची भरपूर गर्दी होती. नाना पाटलांनंतर डांगे बोलायला उभे राहिले. पाहता पाहता त्यांनी सभेवर ताबा घेतला. डांगे यांनी भगवद्गीतेवर अस्खलित एक तास वीस मिनिटांचे भाषण, भाषण कसले प्रवचन केले. या अशा तेव्हाच्या वातावरणाचा नाही म्हटले तरी माझ्यावर परिणाम होत गेला. पुढे मी अत्र्यांचा भक्त म्हणून माझ्या मित्रपरिवारात ओळखला जाऊ लागलो. सांगलीत असताना आणि पुण्यात येत असे तेव्हा आचार्य अत्रे यांची सभा असेल तर ती एकदाही चुकवल्याचे मला आठवत नाही.

आचार्य अत्रे यांच्या सत्तरीनिमित्त पुण्यात त्यांचा जाहीर सत्कार झाला तेव्हा त्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रा. ना.सी. फडके होते. अत्रे त्या समारंभात म्हणाले की आपल्या आयुष्यात अनेक चमत्कार घडले आहेत, पण आजच्याएवढा मोठा चमत्कार आपण कधीही अनुभवलेला नाही. या समारंभाआधी ना.सी. फडके यांनी केसरीत लेख लिहून आचार्य अत्रे यांचा अतिशय उत्तम असा गौरव केला, त्याबद्दल अत्र्यांनी फडके यांचे अतिशय मार्मिक शब्दात आभार मानले. फडके यांनी सर्व तऱ्हेचा उच्चांक मोडलेला आहे, असेही अत्रे यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, की एरवी मी कधी बेशुद्ध पडत नाही, पण माझ्यावर लिहिण्यात आलेला लेख वाचून मी अक्षरश: बेशुद्ध म्हणत नाही, पण मंत्रमुग्ध होऊन गेलो. आमच्यात भांडणाचा, वादाचा बोभाटा करण्यात आला होता, ते भांडण नव्हते, ते तसे नव्हते. त्यांची एक बाजू होती, माझी एक बाजू होती. जे काही होते ते चांगल्या साहित्यासाठी होते. आता भांडण मिटले, याचा अर्थ मराठी साहित्य सुधारले असे नाही. आता इतरांना ते सुधारायची संधी आम्ही दिली आहे.

अत्र्यांचे पुण्यावर आणि अर्थातच महाराष्ट्रावर अपार प्रेम होते. महाराष्ट्राची तुलना त्यांनी विनोदाबाबत इंग्लंडशी केली. इंग्लंड, फ्रान्स अशा देशांमध्ये विनोद आवडतो. विनोद जिथे कळतो ते राष्ट्र मोठे अशी छानशी व्याख्या त्यांनी केली. मला आठवणारी ती सगळ्यात उत्तम सभा. मी समितीच्या अनेक सभाही अनुभवल्या आहेत. जयंतराव टिळक, दाजिबा देसाई, नाना पाटील, उद्धवराव पाटील, एस.एम. जोशी अशा अनेकांच्या सभांना मी स्वत: हजर राहिलो आहे. अत्रे यांच्या अंगी असणारे सभाकौशल्य अपूर्व असे होते. सभांना अक्षरश: लाखालाखाची गर्दी खेचून घेणारी त्यांची वक्तृत्वशैली होती. काव्य, नाट्य, विनोद, चित्रपट, वक्तृत्व, वृत्तपत्र, समाजसेवा, शिक्षण असे त्यांचे अष्टावधानी कर्तृत्व होते. १९५७ मध्ये संयुक्त

महाराष्ट्राच्या लढ्याला धार चढली त्याला एकमेव कारण होते, ते म्हणजे आचार्य अत्र्यांच्या मराठ्यातून आग ओकणारी त्यांची लेखणी. संपूर्ण महाराष्ट्रातून चळवळीला आलेली धार ही अपूर्व होती. अवघा महाराष्ट्र नुसता पेटून उठला होता. 'नरराक्षस मोरारजी' ही मोरारजी देसाई यांची ओळख केवळ 'मराठा'मुळे महाराष्ट्राला झाली.

६ फेब्रुवारी १९५६ रोजी 'संयुक्त महाराष्ट्र समिती'ची स्थापना झाली आणि एखादे चक्रिवादळ घोंघावत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुसाट जावे, तसा समितीचा रुबाब होता. त्यावर्षी सप्टेंबरमध्ये पहिली द्विभाषिकाविरोधी परिषद मुंबईत भरली. समिती हा काही एक पक्ष नव्हता, पण तसे वाटावे अशी अवस्था सुरुवातीस तरी होती. समितीची सभासद नोंदणीही सुरू करण्यात आली होती. तथापी समितीलाही फाटाफुटीचा रोग लागणार हे सुरुवातीसच स्पष्ट झाले होते. समितीमधल्या काहीजणांना तर आपण यशवंतराव चव्हाणांना काँग्रेसमधून समितीत कधी आणतो असे झाले होते. त्यामुळे आचार्य अत्रे यांच्या नेहरूविरोधी आणि चव्हाणविरोधी वक्तव्यावर समितीमधलाच एक गट नाराज असे. गंमत म्हणजे १९६२च्या सार्वत्रिक निवडणुकापूर्वी जर काँग्रेसने संयुक्त महाराष्ट्र दिला तर समितीमधले कोणकोणते गट काँग्रेसमध्ये येऊ शकतात याची चाचपणी काँग्रेस नेत्यांनी तेव्हा केली होती. अत्र्यांनी आपल्या सत्तरीचा सत्कारात मुंबईला सांगितले, की ५७च्या निवडणुकीत समितीला घवघवीत यश मिळणार हे स्पष्ट होते, तेव्हा मीही कोणते खाते स्वत:साठी घ्यायचे ते ठरवून टाकले होते. त्यांच्या शब्दात सांगायचे तर 'समितीचे लोक एवढे हरामखोर निघाले की कसले मंत्रिपद आणि कसले काय? सत्तेच्या दिशेने बरेचजण पळाले होते.'

हेच अत्रे आधीपासून समिती ही प्रतिज्ञा आहे, समिती ही दीक्षा आहे, समिती हे व्रत आहे असे सांगत होते. समितीचा झंझावात एवढा होता की समितीच्या नेत्यांनी ठरवले असते तर काँग्रेसचा पालापाचोळाच झाला असता. अत्र्यांना स्वत:ला तो एक पक्ष म्हणून हवा होता. पुढे पुण्यात झालेल्या अत्र्यांच्या सत्कार सभेत बोलताना अनंत काणेकर यांनी अत्रे हे संयुक्त महाराष्ट्राचा साक्षात्कार झालेले संत आहेत, असे गौरवोद्गार काढले होते. तेव्हा अजून संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हायचा होता. त्यावेळी मुंबईच्या कापडगिरणी कामगारांमध्ये 'इंटक' या काँग्रेसप्रणीत संघटनेचे वर्चस्व होते. समितीमधल्या काही घटक पक्षांनी एकत्र येऊन मुंबई गिरणी कामगार युनियनची स्थापना केली होती.

दैनिक मराठा हे वृत्तपत्र १५ नोव्हेंबर १९५६ रोजी स्थापन झाले. या वृत्तपत्राच्या निर्मितीची कथा ही तर समस्त पत्रकारितेला थक्क करून सोडणारी आहे. ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर १९५६ रोजी द्वैभाषिकाविरोधी परिषद पार पडली. तिचा समारोप झाल्यावर परिषद ज्या शिवाजी पार्कवर भरली होती, त्याच ठिकाणी १ ऑक्टोबरच्या सायंकाळी समितीच्या वतीने सभा भरली. शंकरराव देवांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा गाशा गुंडाळून टाकल्यावर समितीची स्थापना झाली होती. द्वैभाषिकाविरोधी परिषदेच्या समारोपाच्या सत्रात सदाशिवराव बागाईतकर यांनी आपल्या 'सोशालिस्ट' पक्षाचा संयुक्त आघाड्यांना विरोध असल्याचे सांगून, काँग्रेसविरोधी सर्व पक्षांनी समितीच्या झेंड्याखाली लढायला विरोध केला होता. आजच्या समाजवाद्यांची अवस्था काय आहे आणि ते सध्या काय करतात ते समजावून घेण्यासाठीही बागाईतकरांच्या या ठरावाकडेही पाहायला हरकत नाही. या परिषदेच्या समाप्तीनंतर एक तारखेच्या सायंकाळी कोल्हापूरचे भाई माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली अभूतपूर्व अशी सभा पार पडली. बी.टी. रणदिवे, दत्ता देशमुख, उद्धवराव पाटील, एस.एम. जोशी आणि आचार्य अत्रे यांची भाषणे या सभेत झाली. भाई बागल यांनी त्यावेळच्या वृत्तपत्रांवर टीका करून म्हटले, की एवढी मोठी द्वैभाषिकाविरोधी परिषद या मुंबईत गेले दोन दिवस झाली पण दोन ओळींचीही बातमी भांडवलशाही वृत्तपत्रांनी देऊ नये हे धक्कादायक आहे. बागल यांनी श्रोत्यांना उद्देशून म्हटले की या भांडवलशाही वृत्तपत्रांना तुम्ही हातसुद्धा लावता कामा नये. यावर श्रोत्यांनीही, 'अत्रे वृत्तपत्र काढणार असतील तर आम्ही इतर कोणत्याही वृत्तपत्राला हात लावणार नाही' अशी गर्जना केली. कुणाला वाटेल की हे मुद्दामहून घडवून आणले असावे, पण तसे नव्हते. वातावरणच एवढे भारावलेले होते, की सारे काही उत्स्फूर्त होते. आचार्य अत्रे म्हणाले की आपण जर मदत करणार असाल तर मी येत्या विजयादशमीला नवे दैनिक काढतो. आज आपण म्हणतो की अत्रे नसते तर संयुक्त महाराष्ट्र तेव्हा झाला नसता, पण त्या थरारक घटनेची दखल घ्यायचे टाळतो. इतकेच काय, पण महाराष्ट्राचा सुवर्णमहोत्सव साजरा होत असताना अजूनही आपण अत्रे यांचे नाव जमले तरच घेतो. सांगायचा मुद्दा हा की अत्रे यांनी घोषणा करताच हजारो हात वर उठले. संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजेच्या गगनभेदी गर्जना उठल्या. त्यावर अत्रे म्हणाले की नुसत्या टाळ्या वाजवून वर्तमानपत्र निघत नाही, खिशात हात घालावा लागतो. त्यावर स्वयंसेवकांनी पेट्या फिरवल्या. अर्थात ते पैसे काही त्या वृत्तपत्रासाठी पुरेसे असणारे नव्हते. जनतेच्या भावना किती प्रखर होत्या हेच यातून स्पष्ट होते. सेनापती बापट यांना अत्र्यांनी विचारले की तात्या नाव काय ठेवायचे? त्यावर एका क्षणात तात्या म्हणाले, 'मराठा'. मराठ्याचा जन्म हा असा झाला. 'दैनिक मराठा' म्हटले की काँग्रेसवाले चळाचळा कापू लागतात. 'दैनिक मराठा' म्हटे की द्विभाषिकवादी थराथरा कापू लागतात. 'दैनिक मराठा'ने शत्रूंची कधीच गय केली नाही, असे अत्रे यांनी स्वत:च आपल्या 'कऱ्हेचे पाणी' या

आत्मचरित्रात म्हटले आहे. ते म्हणतात, 'महाराष्ट्राचा दुश्मन दिसला की त्याच्या डोक्यावर धडाधड हातोडे हाणून त्याच्या मेंदूचा चेंदामेंदा करणे हा 'दैनिक मराठा'चा धंदा आहे. 'दया तिचे नाव भूतांचे पाळण आणि निर्दाळण कंटकांचे' हे आपले ब्रीद असल्याचे ते मोठ्या अभिमानाने सांगत. साडेतीन कोटी (तेव्हाची लोकसंख्या) मराठी माणसांच्या लोकशाही हक्कांचा खून करून या शिवछत्रपतींच्या महाराष्ट्र सिंहाला द्विभाषिकाच्या पिंजऱ्यामध्ये जबरदस्तीने कोंडताना नेहरू, पंत आणि ढेबर यांना महाराष्ट्राची कधी दया आली होती का, असेही ते विचारतात.

संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्यावर आपण एक क्षणही समितीत राहणार नाही, असे काही प्रजासमाजवादी पुढारी म्हणू लागले, असे सांगताना त्यांचे एक 'आवडते' समाजवादी नानासाहेब गोरे यांच्यावर तर ते तुटून पडतात. ते म्हणतात, की 'अजून संयुक्त महाराष्ट्राला अवकाश की तिकडे नानासाहेब गोरे यशवंतराव चव्हाणांशी गुप्त वाटाघाटीही करू लागले होते. त्यांच्या समितीविरोधी हालचाली उजेडात आणल्याने प्रजासमाजवाद्यांचा नुसता तिळपापड झाला आहे.' आपल्या वृत्तपत्राला जाहिराती मिळणे किती अवघड होते याची त्यांना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच ते म्हणतात, की 'खपाच्या दृष्टीने 'दैनिक मराठा' हे महाराष्ट्रातील तीन अग्रगण्य दैनिकांमधले एक अग्रेसर दैनिक आहे. राजकीय द्वेषाच्या आणि व्यावसायिक मत्सराच्या भांडवलाच्या जोरावर 'दैनिक मराठा'सारख्या महाराष्ट्रनिष्ठ वृत्तपत्राचे नुकसान करण्याचा जो कोणी प्रयत्न करील त्याचे मराठी जनता अक्षरश: थोबाड फोडल्यावाचून राहणार नाही. साडेतीन कोटी मराठी जनतेचे संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार व्हावे आणि महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीचे राज्य यावे यापेक्षा 'दैनिक मराठा'ला दुसरे कोणतेही धोरण वा राजकारण नाही. त्याचे गोत्र शिवछत्रपती, त्याचे प्रवर तीन- फुले, टिळक आणि आंबेडकर. अन त्याचा प्रश्न एक- मराठी जनतेचा. ह्यापेक्षा स्वत:बद्दल सांगण्यासारखे काही नाही. आमच्यावर प्रेम करणाऱ्या सहस्रावधी मराठी जनतेच्या चरणी आमची कृतज्ञतापूर्वक अनेक लोटांगणे असोत. जय महाराष्ट्र, जय भारत.'

ही जी भाषा आहे ती आज आपल्याला किंवा नजीकच्या गतकाळात आपण कुठे अनुभवली आहे ते मराठी वाचकांना सांगितलेच पाहिजे असे वाटत नाही. हा विषय संयुक्त महाराष्ट्र लढ्याचा आहे म्हणून पण ज्यांना कुणाला अत्रे यांची भाषाशैली, त्यांचा परखडपणा अनुभवायचा आहे त्याने अत्रे-ना.सी. फडके यांच्यात रत्नागिरी साहित्य संमेलनापासून सुरू झालेला वाद मुद्दाम वाचावा. फडक्यांच्या त्यांनी आपल्या लिखाणाने अक्षरश: चिंध्या-चिंध्या करून टाकल्या आहेत. महाराष्ट्रातल्या भल्या भल्या साहित्यिकांना आणि अनंत काणेकरांसारख्या अत्रेमित्राला पत्रक काढून आता थांबा असे सांगावे लागले आहे. ते तात्पुरते थांबे आणि ते पुन्हा सुरू होई. ते एकदाचे थांबले ते अत्रे यांच्या पुण्यातल्या अगदी शेवटच्या सत्कार समारंभाने, ज्याचा उल्लेख प्रारंभी केला आहे.

ज्या काळात दळणवळणाच्या सोयीसुविधा अतिशय बेताच्या होत्या. फॅक्स, मोबाईल, संगणक आदी गोष्टी नावालाही नव्हत्या त्या काळात खिशात पैसे नसताना दैनिक वृत्तपत्र काढणे ही सोपी गोष्ट नव्हती. अत्रे यांना नवयुग साप्ताहिकाचा अनुभव होता, दैनिकाचा नव्हता. तथापि ते अत्रे होते. डगमगतील तर ते अत्रे कसले? अत्रे हाच मुळात त्या काळातला सर्वांत मोठा चमत्कार होता. मराठा १५ नोव्हेंबर १९५६ रोजी जन्मला. त्याचा पहिला अंक अर्थातच अत्यंत देखणा असा होता. त्यावेळी मराठ्यात ज्यांनी काम केले त्यांनी अत्रे यांची त्या दिवसाची, त्या रात्रीची तगमग अनुभवली. त्यांनी त्यांचे वर्णनही 'अचाट' या एका शब्दाने केले आहे. १५ नोव्हेंबर १९५९ रोजी मराठा स्वत:च्या 'शिवशक्ती' या इमारतीत गेली. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या हस्ते 'शिवशक्ती'चे उद्घाटन झाले. अत्रे यांनी समितीच्या प्रत्येक पक्षाचा एका प्रतिनिधी संचालक मंडळावर घ्यायचा आणि प्रत्येक संचालकाने पाच हजार रुपये शेअर भांडवल टाकायचे आणि समितीच्या पुरस्काराचे हे दैनिक उभे करायचे अशी कल्पना मांडली. ती फलद्रुप झाली नाही. आर्थिकदृष्ट्या सधन वर्गातल्या मंडळींनाही अत्रे यांनी तेव्हा संचालक मंडळावर यायची विनंती करून पाहिली होती. तथापि ते घडावयाचे नव्हते. तसे घडते तर 'मराठा' संपलाच नसता. संयुक्त महाराष्ट्र झाला तरी त्याची गरज संपली नव्हती. ती पुढेही होती. 'मराठा' हा मुळातच अन्याय करणाऱ्या शक्तींना हादरवून टाकणारा शब्द होता.

आम्ही पत्रकारितेत असताना अत्रे या अफाट शक्तीच्या संपादकांना भेटण्याचा योग आला, तेव्हा त्यांनी आम्हाला, विशेषत: ज्याला मोठे व्हायचे आहे असे त्याला काय वाचावे, काय वाचू नये, याचे धडे दिले होते. ते आजही आम्हाला उपयुक्त वाटतात. अत्रे ही दोन अक्षरी मात्रा अनेक व्याधींवर गुणकारी होती. आताच्या निगरगट्ट राजकारणात ती चालती तर निदान राजकारणाची ही बजबजपुरी तरी रोखली गेली असती. संपादक अत्रे हे राजकारणी, नाटककार, विडंबनकार, साहित्यिक, शिक्षणतज्ञ, फर्डे वक्ते यांच्यापेक्षा अधिक भावतात याचे कारण अर्थातच हेच आहे. असे कट्टर महाराष्ट्रवादी अत्रे पुन्हा होणे नाही हे तर खरेच, पण ते होणे नाही म्हणून त्यांचे ऋणही मान्य करायचे नाही म्हणजे काय? महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवाच्या सभेतसुद्धा दिल्लीत बोलणाऱ्यांनी अत्रे यांचा उल्लेख केला नाही हे खटकणारे होते. शरद पवारांनीही तो केला नाही आणि मुंबईतही तो कुणी केला नाही.

**अरविंद गोखले**
arvindgokhale@gmail.com

# काय वांछिले, काय मिळाले?

**दि.भा. घुमरे** (ज्येष्ठ संपादक)

संयुक्त महाराष्ट्राचा 'मंगलकलश' यशवंतराव चव्हाण यांनी स्वीकारला आणि १ मे १९६० रोजी द्विभाषिक मुंबई राज्य संपून महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्र राज्याबरोबरच महागुजरात या वेगळ्या राज्याचाही उदय झाला. ब्रिटिश राजवटीपासून चालत आलेला मुंबई इलाखा नामशेष झाला. नव्या महाराष्ट्र राज्यात जुन्या मध्यप्रदेश आणि वऱ्हाड म्हणजेच विदर्भ तसेच निजामाच्या हैदराबाद संस्थानात गुदमरलेला मराठवाडा हे मराठी भाषिक विभाग सामील झाले. द्विभाषिकात असलेले यशवंतरावांचे मुख्यमंत्रिपद नव्या राज्यात कायम राहिले.

संयुक्त महाराष्ट्राचा 'मंगलकलश' जरी यशवंतरावांनी आणला असला, तरी संयुक्त महाराष्ट्राचे ध्येय, १९६०च्या पूर्वी जवळजवळ पन्नास वर्षे, भाषावर प्रांतरचनेच्या विचाराच्या अनुषंगाने दोन पिढ्यांनी नुसतेच जोपासले नव्हते, तर त्यासाठी सभा, संमेलन, अधिवेशने, परिषदा या माध्यमातून विविधांगी प्रयत्न सतत सुरू ठेवले होते. यातील काही टप्पे पुढीलप्रमाणे आहेत:

१. 'केसरी' चे संपादक साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी १९११ च्या डिसेंबरमध्ये 'केसरी'तील अग्रलेखातून महाराष्ट्र एकीकरणाच्या प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधले.

२. कॉंग्रेसने १९२० साली आपल्या कारभाराला भाषेचे तत्त्व लागू करून मुंबई शहर, महाराष्ट्र, विदर्भ आणि नागपूर अशा चार प्रांतिक कॉंग्रेस कमिट्या तयार केल्या.

३. मुंबईत १९३८ एप्रिलमध्ये महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या २३ व्या अधिवेशनात अखिल महाराष्ट्राचा एक प्रांत बनविण्यात यावा, अशी मागणी करणारा ठराव संमत करण्यात आला.

४. मध्यप्रांत-वऱ्हाड या प्रांतातील, मराठी प्रदेशाचा 'विदर्भ' या नावाने प्रांत बनविण्यात यावा, अशी मागणी करणारा बॅ. रामराव देशमुख यांचा ठराव मध्यप्रांत-वऱ्हाड कायदेमंडळाने १ ऑक्टोबर १९३८ रोजी मंजूर केला.

५. ग. दि. पटवर्धन यांनी २८ जानेवारी १९४० रोजी मुंबईच्या सरदारगृहात झालेल्या बैठकीत बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त महाराष्ट्र सभा' स्थापना केली.

६. या संयुक्त महाराष्ट्र सभेच्या वतीने नागपूर येथे नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. टी. जे. केदार यांच्या अध्यक्षतेखाली पहिली महाराष्ट्र एकीकरण परिषद झाली.

७. वर्धा येथे १८ ऑगस्ट १९४० रोजी पहिली महाविदर्भ परिषद भरून तीत बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महाविदर्भ सभा स्थापन करण्यात आली.

८. अमरावती येथे ३ ऑक्टोबर १९४३ रोजी बॅरिस्टर मुकुंद रामराव जयकर यांच्या अध्यक्षतेखाली महाविदर्भ परिषदेचे दुसरे अधिवेशन भरले.

९. बेळगाव येथे १९४६ साली, महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या ३० व्या अधिवेशनात संयुक्त महाराष्ट्र प्रांत स्थापन करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर होऊन या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी 'संयुक्त महाराष्ट्र समिती' निर्माण करण्यात आली.

१०. या समितीच्या प्रयत्नांनी मुंबई येथे २८ जुलै १९४६ रोजी द्वितीय महाराष्ट्र एकीकरण परिषद शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली भरली. त्या परिषदेत संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यात आली.

११. जळगाव येथे १३ एप्रिल १९४७ रोजी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन झाले.

१२. यानंतर संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ येथील कार्यकर्त्यांची सभा अकोला येथे भरून ८ ऑगस्ट १९४७ रोजी 'अकोला करार' करण्यात आला.

१३. संयुक्त महाराष्ट्र परिषदेतर्फे १६ ऑक्टोबर १९४८ रोजी (मुंबई) दादरच्या शिवाजी पार्कवर बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे विराट अधिवेशन झाले.

१४. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा येथील कॉंग्रेस कार्यकर्ते आणि कॉंग्रेसी मंत्री यांच्या नागपूर येथील बैठकीत २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपूर करार झाला.

१५. यानंतर पुणे येथे १ फेब्रुवारी १९५६ रोजी समाजवादी नेते एस. एम. जोशी यांच्या नेतृत्वाखाली (प्रमुख विरोधी पक्षनेत्यांच्या सभेत) संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली.

इ. स. १९११ ते १९६० या अर्धशतकात जो विचार झाला त्याचे सार वरील पंधरा बिंदूंमध्ये सामावले आहे. यातील १ ते १४ या बिंदूंमधील सार हे मुख्यत: कॉंग्रेस पक्षातील आणि काही बाबतीत समविचारी अशा मंडळींनी केलेले विचारमंथन आणि त्यातील निष्कर्ष या स्वरूपाचे आहे, तर पंधराव्या बिंदूत कॉंग्रेसला उघडउघड विरोध करणाऱ्या विरोधी पक्षीय मंडळींनी आंदोलनाच्या रूपाने विराट लोकशक्ती

जागृत करून ध्येयप्राप्तीसाठी उभारलेला लढा, हा आयाम आहे. संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन होण्यापूर्वीच्या विचारमंथनात काँग्रेस पक्षांतर्गत विचारक सक्रिय होते आणि ते बहुतांशी काँग्रेस पक्षाच्या शिस्तीने बांधले गेले होते. संयुक्त महाराष्ट्र समिती हा उघडउघड विरोधी मंच होता. परंतु, दोहोंचा वैचारिक वारसा समान होता. या वैचारिक वारशामुळे मराठी भाषा, महाराष्ट्र संस्कृती, महाराष्ट्राचा उज्ज्वल इतिहास, त्याची थोर संतपरंपरा, त्याने देशाला दिलेले नेतृत्व असे अनेक भावगर्भ विषय जसे समोर आले त्याचप्रमाणे शोषक आणि शोषित, आहे रे आणि नाही रे असे अनुषंगिक विषयही ऐरणीवर येत गेले. शासनसौकर्य, एकरसता, एकजिनसीपणा वगैरे कारणांसाठी भाषावर प्रांतरचनेचे जे तत्त्व स्वीकारण्यात आले होते ते नंतर प्रचाराच्या गदारोळात गौण ठरून भारतीय संदर्भात महाराष्ट्राची पृथगात्मता सिद्ध करण्याच्या दुरभिमानापर्यंत ते घरंगळत गेले.

काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वास महाराष्ट्राची बाजू मांडणाऱ्यांच्या या अतिउत्साहामुळे आणि पृथगात्मतेच्या टोकाच्या भाषेमुळे संशयाची बाधा झाली. त्यामुळे पुढे वेगळ्या महाराष्ट्र या भाषिक राज्याच्या मागणीच्या संदर्भात, केन्द्रीय नेतृत्वात आणि विशेषत: पंतप्रधान पं. नेहरूंच्या मनात विकल्प उत्पन्न होऊन 'नाही'ची भाषा तीव्र होत गेली. १९५६च्या अखेरीस राज्य पुनर्रचना आयोगाचा जो अहवाल प्रसिद्ध झाला त्यात विदर्भ हे वेगळे राज्य सुचविले गेले होते. दुसरे मुंबई राज्य आणि तिसरे महाराष्ट्र व गुजरात असे तीन हिस्से होते. म्हणजेच तीन वेगवेगळी राज्ये सुचविली गेली होती. परंतु, केन्द्रात यावर विचार होऊन महाराष्ट्र, गुजरात आणि विदर्भ मिळून एक द्विभाषिक राज्य १९५८ साली निर्माण करण्यात आले. राज्य पुनर्रचना आयोगाच्या अहवालाविरुद्ध तर महाराष्ट्रात जनक्षोभ उसळलाच होता; त्यानंतर केन्द्राने त्या अहवालातील शिफारशींवर विचार करून त्यावर द्विभाषिकाचा जो तोडगा काढला त्याविरुद्धही महाराष्ट्र, गुजरात आणि विदर्भ या विस्तीर्ण क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात जनक्षोभ उसळला.

राज्य पुनर्रचना आयोगाने वेगळ्या विदर्भ राज्याची शिफारस केलेली असूनही केन्द्राने विदर्भाला द्विभाषिकात कोंबावे, याविरुद्ध प्रतिक्रिया तर उमटल्या, परंतु त्या महाराष्ट्र भागातील प्रतिक्रियांप्रमाणे सर्वस्तरीय आणि सार्वत्रिक नव्हत्या. त्या काही विशिष्ट गटातून आणि भागातून त्या उमटत गेल्या. महाराष्ट्राच्या मागणीला शहरी आणि ग्रामीण, सामान्यजन आणि अभिजन, पांढरपेशी आणि श्रमिक, याचबरोबर सामाजिक, आर्थिक आणि साहित्यिक अशा आडव्याउभ्या सर्व क्षेत्रांतून प्रचंड आणि सक्रिय समर्थन लाभलेले होते. तसे ते विदर्भाच्या मागणीला कधीच लाभले नाही. मध्यप्रांत-वऱ्हाड कायदेमंडळात १९३८ साली बॅ. रामराव देशमुख यांच्या वेगळ्या विदर्भ राज्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर पुढे दोनच वर्षांनी मुंबई येथील सरदारगृहातील बैठकीत बॅ.रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र सभा स्थापना झाली. पुढे नागपूर येथे पहिली महाराष्ट्र एकीकरण सभा झाली. त्यानंतर वर्धेला पहिली महाविदर्भ सभा बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन होऊन अमरावतीस तिचे दुसरे अधिवेशन झाले. वेगळ्या महाराष्ट्राची मागणी, संयुक्त महाराष्ट्र सभा, महाराष्ट्र एकीकरण परिषद यात बॅ. रामराव देशमुख सहभागी होते. तसेच वेगळे विदर्भ राज्य, महाविदर्भ सभा आणि नंतर संयुक्त महाराष्ट्रासाठी प्रथम अकोला करार आणि नंतर नागपूर करार यातही त्यांचा सहभाग होता. यामुळे वेगळ्या विदर्भाच्या मागणीला बळ म्हणून तर कधी चढलेच नाही; खेरीज हा विचार तळागळापर्यंत कधी मूळही धरू शकला नाही.

जुन्या मध्यप्रांत-वऱ्हाड राज्यात राजकीय जागृतीत मराठी नेतृत्वच सदैव पुढे राहत आले. परंतु, शासनात आणि आर्थिक-औद्योगिक क्षेत्रात अमराठी गट वरचढ होते. मध्यप्रांत-वऱ्हाड या राज्यात मराठी भाषिक विदर्भ हा एकतृतीयांश, तर हिंदी भाषी विभाग दोनतृतीयांश होता. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरचे पहिले मंत्रिमंडळ आणि पहिली विधानसभा यात हिंदी भाषकांचेच वर्चस्व राहिले. शासकीय सेवा आणि औद्योगिक क्षेत्र यातही हिंदी भाषकांचा वरचष्मा होता. याचे चटके मराठी भाषकांना ठायी ठायी सहन करावे लागत. त्यामुळे सुशिक्षित आणि अभिजन वर्गाचा ओढा संयुक्त महाराष्ट्राकडे वाढत गेला. वर्धा नदीपलीकडील विदर्भात बहुजन समाजात आणि कृषक समाजात, सत्यशोधक समाजाच्या कार्यामुळे तसेच पिढ्यान्‌पिढ्या 'बावन्नवऱ्हाड'च्या रेंगाळणाऱ्या वस्तुस्थितीमुळे, वेगळे विदर्भ राज्य झाल्यास भटजी-शेटजीचे राज्य येईल, ते अधिक शोषण आणि अन्याय करणारे ठरेल, असा जो सततचा प्रचार काही पुढाऱ्यांकडून केला जात होता, त्याच्या परिणामी बहुजन समाज आणि कृषक समाज काहीसा तटस्थ, तर बव्हंशी महाराष्ट्र राज्याच्या मागणीला अनुकूल होता. याला दुसरे जे कारण होते ते सांस्कृतिक हितसंबंधांचे होते. सारी ऐतिहासिक, धार्मिक आणि राजकीय श्रद्धास्थाने तिकडे महाराष्ट्रातच होती आणि तिकडेच इकडच्या बहुतांश पांढरपेशांची आणि वारकरी संप्रदायामुळे कृषकांची नाळ जुळलेली होती. या दोन कारणांमुळे वेगळ्या विदर्भ राज्याच्या मागणीला रा.पु. आयोगाच्या पूर्वकाळी सार्वत्रिक असा प्रतिसाद कधीच मिळाला नाही. रा.पु. आयोगाने वेगळा विदर्भ सुचविला असूनही तो नाकारला गेला तेव्हा ते लोकक्षोभाचे कारण ठरले. पण, हा लोकक्षोभ विशिष्ट चार-पाच शहरे आणि मुख्यत: नागपूर शहर यापलीकडे पसरू शकला नाही. महाराष्ट्रातील अभिजनवर्ग ज्या मोठ्या प्रमाणात संयुक्त महाराष्ट्राच्या ध्येयासाठी सक्रिय राहिला त्या तुलनेत विदर्भातील अभिजनवर्ग काही विदर्भाच्या मागणीच्या समर्थनार्थ सक्रिय झाला नाही. द्विभाषिक

राज्याच्या स्थापनेनंतर संयुक्त महाराष्ट्र समितीच्या आंदोलनाने जोर धरला. विधिमंडळात निर्वाचित सदस्यांकडून आणि विधिमंडळाबाहेर राजकीय पुढाऱ्यांबरोबरच सामाजिक, आर्थिक, साहित्यिक अशा विविध क्षेत्रातील नामवंत तसेच महाविद्यालयीन विद्यार्थिनेते आणि कामगार या सर्वांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी अंतिम लढा सुरू केला. सभा, मोर्चे, निदर्शने, हरताळ या उपायांनी भडकलेल्या या आंदोलनात ठिकठिकाणी धरपकडी, पोलिस लाठीमार आणि मुंबईत तर अनेकदा गोळीबार इथपर्यंत तीव्रता पोहोचल्याने द्विभाषिक राज्य सुखासुखी चालविणे अशक्य होत गेले. श्री. मोरारजीभाई देसाई १९५६ ते १९५८ या काळात मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री होते. त्या काळात सं.म. समितीच्या आंदोलनात झालेल्या पोलिस गोळीबारात १०६ जणांचे बळी गेले होते. या १०६ हुतात्म्यांचे स्मरण सतत जागृत ठेवून समितीने आपले आंदोलन इतके सर्वंकष केले की त्यापुढे काँग्रेस पक्ष झाकोळून गेला होता. परंतु यशवंतराव चव्हाणांच्या धीम्या आणि निश्चयात्मक धोरणामुळे काँग्रेस पक्ष वरपांगी निष्प्रभ होताना दिसत-भासत असला तरीही शेवटी यशवंतराव चव्हाणच संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार करून दाखविणार, असा दृढविश्वास काँग्रेस पक्षात आणि राजकीय क्षेत्रातील जाणकारांत आढळून येऊ लागला. समितीचे आंदोलन महाराष्ट्रात, तर चव्हाणांचे राजकारण दिल्लीत! महाराष्ट्र आणि गुजरात यातील काँग्रेसश्रेष्ठींनी काँग्रेस कार्यकारिणीत आपापल्या मागण्यांवर चर्चा घडवून अनुकूल निर्णय हाती घ्यावा असे प्रयत्न चालविले होते; तर महागुजरात समिती आणि संयुक्त महाराष्ट्र समिती यांनी संयुक्त लढा देण्याचे पुणे बैठकीत ठरविले. या सर्व काळात पंतप्रधान पं.नेहरू द्विभाषिकाचे सभा-पत्रपरिषदांतून सतत समर्थन करीत होते. नेहरू १९५७च्या नोव्हेंबरात प्रतापगडावरील शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी आले असताना विमानतळापासून प्रतापगडापर्यंत संयुक्त महाराष्ट्र समितीने काळ्या झेंड्यांनी आणि निषेध घोषणांनी संपूर्ण रस्ताभर जी निदर्शने केली होती त्याचा राग त्यांच्या मनात होता खरा, परंतु पुढे १९५९ मध्ये काँग्रेस कार्यकारिणीत जी चर्चा झाली त्या चर्चेतून जास्त ताणले तर महाराष्ट्र आणि गुजरात या दोन्ही प्रदेशांतून काँग्रेसला जबर हादरे बसतील हे उमगताच त्यांनी नरमाईचे धोरण स्वीकारले. परिणामी, सप्टेंबर १९५९ मध्ये द्विभाषिकाच्या विभाजनाचे संकेत मिळू लागले आणि या समस्येचा विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या (नवरत्न समिती म्हणून नावाजलेली) शिफारशी मान्य होऊन महाराष्ट्र व गुजरात असे दोन राज्यांत द्विभाषिक राज्याचे विभाजन करण्याचा निर्णय काँग्रेस कार्यकारिणीने ४ डिसेंबर १९५९ रोजी घेतला आणि अशा रीतीने यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश दिल्लीहून आणला. केंद्र सरकारने १ मे १९६० रोजी महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांची घोषणा केली.

या घोषणेचे महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्रप्रेमी जनतेने ठिकठिकाणी हर्षभरीत स्वागत केले. विजयसभा आणि विजयमोर्चे यांनी महाराष्ट्र दुमदुमला. विदर्भात मात्र या घोषणेने विदर्भवादी नाराज झाले. सं.म. समितीच्या सभा-मिरवणुकांतून विजयाचा आनंद व्यक्त झाला, पण त्याला उधाण आले नाही. याउलट, विदर्भवाद्यांनी पाळलेला निषेधदिन साऱ्या उग्रतेचा कळस गाठणारा ठरून गाजला. क्षणिक उठलेली ती उग्र प्रतिक्रिया पुढे व्यापक आंदोलनात आणि सातत्यपूर्ण चळवळीत आजतागायत परिवर्तित होऊ शकली नाही.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या मनात महाराष्ट्राची प्रकृती आणि त्याची जडणघडण याविषयी जे विचार जोपासून ठेवले होते त्याला मूर्त रूप देण्यासाठी महाबळेश्वर येथे तीन दिवसांचे एक शिबिर घेतले. या शिबिरात काँग्रेस पक्षाचे आमदार, खासदार, शासनाच्या सर्व खात्यांचे उच्च अधिकारी, पक्षाचे अध्यक्ष व अन्य पदाधिकारी आणि निवडक विशेषज्ञ अशा सर्वांसमोर यशवंतरावांनी महाराष्ट्रात कृषिऔद्योगिक समाजरचना हा आकृतिबंध तयार करण्याची आपली कल्पना विस्ताराने मांडली.


औद्योगिक युगात कृषिक्षेत्राकडे झालेले दुर्लक्ष, प्रथम पंचवार्षिक योजनेत गौण ठरलेले कृषिक्षेत्र, पहिल्या योजनेत कृषिक्षेत्रात प्राधान्य हवे, किंबहुना ती कृषिआधारित असावी, हा केन्द्रीय मंत्री चिंतामणराव देशमुखांचा आग्रह, तो डावलला गेल्याने चिंतामणरावांनी दिलेला राजीनामा; या अशा पार्श्वभूमीवर यशवंतरावांनी जो नवा कृषी-औद्योगिक समाजरचनेचा आकृतिबंध महाबळेश्वर शिबिरात ठेवला, तो शिबिरात सम्मिलित जाणकारांना एक नवे आकर्षक आव्हान ठरला. शेतीशी संलग्न सर्व सोयी आणि सुधारणा या बरोबरच कृषिमालाचे कृषिक्षेत्रातच प्रक्रिया उद्योग स्थापन करणे, तीन वर्षांची औद्योगिक शांतता सर्वसंमती जे प्रस्थापित करून उद्योगांचे विकेन्द्रीकरण करणे, उद्योग आणि रोजगार यासाठी शहरांकडे धाव घेण्यापेक्षा ग्रामीण भाग शिक्षण, स्वास्थ्य, उद्योग, रोजगार या सर्व दृष्टींनी स्वायत्त आणि स्वावलंबी करणे, थोडक्यात महाराष्ट्र राज्याचा सर्वप्रकारे कायापालट करणे, असा हा विकासोन्मुख विचार मांडताना इथून पुढे महाराष्ट्रातील नेतृत्व हे केवळ बोलघेवडे, फक्त टीकाटिप्पणी करणारे नेतृत्व राहणार नाही तर ते कार्यक्रमाधिष्ठित, विकासासाठी तळमळणारे तत्पर नेतृत्व असावे, हा नवा कर्मयोगही यशवंतरावांनी सांगितला. या शिबिरानंतरच्या त्यांच्या विविधप्रसंगी केल्या गेलेल्या भाषणातून त्यांनी महाराष्ट्रातील समाज हा शोषणमुक्त, समतावादी, उद्यमशील, बदलत्या जगाची सर्व आव्हाने समर्थपणे पेलणारा आणि त्याचबरोबर महाराष्ट्राचा उज्ज्वल इतिहास, त्याची आगळी संस्कृती, त्याची संतपरंपरा, त्याच्या राजकीय नेतृत्वाने घडविलेले ध्येयदर्शन या सर्वांचे भान

राखणारा एक आदर्श समाज म्हणून संपूर्ण देशात गौरवास्पद आणि अनुकरणीय ठरावा हे भव्य, दिव्य स्वप्न त्यांनी जनतेपुढे ठेवले.

अधिक तपशिलात आणि खोलात न शिरताही महाराष्ट्र राज्य स्थापनेपूर्वीच्या काळात आणि प्रत्यक्ष महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर काय वांछिले होते आणि आज काय घडले आहे, घडत आहे त्यावरून वरवर नजर फिरविली तरी महाबळेश्वर शिबिरातील विचारमंथन आणि ध्येयदर्शन याच्या विपरीतच सर्व घडते आहे हे सांगण्यासाठी अधिक लेखा विस्ताराची गरज नाही. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती व्हावी या मागणीच्या काळातील लोकमानस, संघर्षकाळातील लोकमानस आणि महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यावर प्रत्ययास आलेले लोकमानस याचा पडताळा घेतला तर लोकशाहीच्या जागी प्रतिनिधीशाही, समतावादाच्या जागी सामंतवाद, शिक्षण आणि स्वास्थ्य हे सर्वांना सुलभ आणि स्वस्त असण्याऐवजी या दोहोंविषयीची आपली घटनात्मक जबाबदारी झटकून या क्षेत्रांत संबंधितांना मोकळे रान उपलब्ध करून देणारी भ्रष्ट आणि नफेखोर व्यवस्था, आहे रे आणि नाही रे यांच्यातील अंतर कमी व्हावे म्हणून उत्पन्नाच्या किमान आणि कमाल फरकाने १:७ हे वांछित प्रमाण इतिहासजमा होऊन 'जो जे वांछिल तो ते लाहो' ही 'मुक्त अर्थव्यवस्था', नेते म्हणविणाऱ्या मुखंडांनी निवडणूक अर्ज भरण्याच्या वेळी घोषित केलेले त्यांचे (पांढरे) संपत्तिधन एक दीड कोटींपासून वीस-तीस कोटीपर्यंत जाहीर होणे, हे सर्वसामान्यांचे डोळे पांढरे करणारे असून, वर उल्लेखिलेले सर्व अवांछित 'पेन बदलले म्हणून व्याकरण आणि गणित सुधारत नाही' या म्हणीचा प्रत्यय देणारे आहे. हे अपशय महाराष्ट्राचे भव्यदिव्य स्वप्न ज्यांनी आपल्या तरुणपणी पाहिले होते त्यांचा भ्रमनिरास करणारे ठरले आहे. शासनसौकर्यासाठी भाषेचे तत्त्व आणि त्यासाठी भाषावार प्रांतरचना, हा विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील विचार काळाने गतार्थ ठरविला आहे. आता 'महाराष्ट्र राज्य' ही फक्त गतानुगतिकता आणि परंपरांचे अधूनमधून दर्शन घडविणारे एक कर्मकाण्ड तेवढे उरले आहे आणि हेच आजचे 'महाराष्ट्र राज्या'विषयीचे लोकमानस आहे.

'काय वांछिले आणि काय मिळाले-मिळविले?' हा प्रश्न जर महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात महाराष्ट्राच्या नागरिकांनी विचारला तर तो आत्मनिंदक प्रश्न खचितच ठरणार नाही, इतका सर्वच बाबतीत स्वप्नभंग झालेला आहे.


**दि.भा. घुमरे**
भालचंद्र अपार्टमेंट,
मेडिकल टीबी वार्डसमोर, नागपूर.
फोन : (०७१२) २७४८७२५



**आईच्या कविता** – **अरुण शेवते**
**मूल्य ७० रुपये सवलतीत ४० रुपये**
अरुण शेवते यांचा आईवर लिहिलेल्या कवितांचा हा अनोखा संग्रह.
या संग्रहास रेखाचित्रे आणि मुखपृष्ठ **गुलजार** यांचं आहे.



**कवितेच्या कविता** – **अरुण शेवते**
**मूल्य ७० रुपये सवलतीत ४० रुपये**
हा संग्रह कवी, कविता, रसिक आणि तदनुषंगाने येणारे प्रश्न यांना वाहिलेला आहे. हे कवितेचे तत्त्वज्ञान आहे आणि ते मांडलेले आहे पुन्हा कवितेमधूनच. मराठीतील अशा प्रकारचा हा पहिलाच संग्रह आहे.
**– डॉ. सदानंद मोरे**



**माझ्या काळाचा अनुवाद** – **चंद्रशेखर सानेकर**
**मूल्य ८० रुपये सवलतीत ३५ रुपये**
ताजा गझलसंग्रह.

# आता उठवू सारे रान....

**महेश म्हात्रे** (कार्यकारी संपादक 'नवशक्ति')

महाराष्ट्र - याच्या नावातच महानता वसलेली दिसते. महाराष्ट्राच्या जन्मापासून या प्रदेशाने आपले स्वतःचे एक अस्तित्व निर्माण केले. म्हणूनच महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीने महाराष्ट्राचा इतिहास लिहिला. एका प्रसिद्ध कवीला महाराष्ट्राचा आजचा नकाशा कुऱ्हाडीच्या पात्यासारखा वाटतो. परंतु कविकल्पना सोडा, जर आपण महाराष्ट्राचा इतिहास पाहिला तर तो कायमच आपल्या अंगभूत पराक्रमाने आणि तेजाने कुऱ्हाडीच्या पात्यासारखा तपळत राहिलेला दिसतो. महाराष्ट्राचे आजचे स्वरूप विसरा. इ. स. १७६० पासून मराठ्यांनी पंजाब, ओरिसा, संयुक्त प्रांत आदी प्रदेशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. १७५८ मध्ये राघोबाने मराठ्यांचा झेंडा अटकेपार नेला आणि इ.स.१७७१ मध्ये माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत मराठी साम्राज्य अवघ्या हिंदुस्थानभर पसरले होते. नेमक्या शब्दात सांगायचे तर सुमारे तीन चतुर्थांश तत्कालीन हिंदुस्थानच्या भूमीवर मराठ्यांचा जरीपटका डौलाने फडकत होता. इ.स.१८०३ मध्ये तर मराठी साम्राज्याचा विस्तार छत्रपती शिवाजी महाराजांच्या जहागिरीच्या २३९ पट अधिक झाला होता. आणि मराठी साम्राज्याचे उत्पन्न ५४ हजार पटींनी वाढले होते. १६४८ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी पाहिलेले हिंदवी स्वराज्याचे स्वप्न अवघ्या १५० वर्षात हिंदुस्थानभर पसरवण्याचे कार्य मराठी शिलेदारांनी केले होते. तसे पाहायला गेले तर मराठेशाहीचा त्या आधीचा इतिहास काही फारसा स्फूर्तिदायक नव्हता. काळ्या मातीत राबणाऱ्या या कणखर मनगटांना दुसऱ्यांची चाकरी करण्याची सवय झाली होती. आपली तुंबडी भरून घेण्यासाठी मराठे कोणत्याही बादशहाची चाकरी करीत. त्याच्या विजयासाठी स्वतःच्या जीवाची बाजी लावून लढाई करणे त्यांना धर्मकार्य वाटत असे. अगदी त्यासाठी हे देव, देश आणि आपल्या भाईबंदांशी गद्दारी करायलाही मागेपुढे पाहत नसत. अशा या गुलामीने गांजलेल्या महाराष्ट्रात शिवप्रभूंचा जन्म झाला. त्या एका माणसाच्या अस्तित्वाने अवघ्या मुलखाचे नशीब पालटले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले पिताश्री राजे शहाजी भोसले यांच्या पावलावर पाऊल टाकले असते आणि विविध बादशहांच्या सेवेत आपले आयुष्य खर्ची घातले असते तर आज महाराष्ट्राचा इतिहास आणि भूगोलही बदललेला दिसला असता. कदाचित आजच्या महाराष्ट्राला असलेले महाराष्ट्र हे नावही प्रचलित नसते आणि मराठ्यांमधील मराठी बाणाही शिल्लक राहिला नसता. छत्रपतींना समकालीन असलेल्या कविराज भूषण यांनी भूषण काव्यामध्ये सुंदर दोहा लिहिला आहे.

**H$er h H$s H$bm OmVr ।&**
**_Wam _ñOrX hmVr ।&**
**O~ {edmOr Z hmV ।&**
**V~ gÞV hmV ।g~H$s ।&&**

त्या दोह्याला असलेला धार्मिक संदर्भ सोडला तरी त्यातील सामाजिक अर्थ लक्षात येतो. एक माणूस आपल्या अस्तित्वाने अवघ्या प्रांताचे भवितव्य बदलू शकतो हे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्य कर्तृत्वाने दाखवून दिले आहे. त्याचे स्मरण महाराष्ट्र स्थापनेला पन्नास वर्षे होत असताना प्रकर्षाने होते. व्यक्तिपूजेचा कितीही आरोप केला तरी आज १० कोटींच्या मराठी जनतेच्या अंतर्मनात एकच इच्छा दाटलेली आहे. ती म्हणजे, 'अंधार खूप झाला आता एक दिवा पाहिजे । समस्यांनी घेरलेल्या महाराष्ट्राला जिजाऊचा शिवा पाहिजे ।।'

महाराष्ट्राची विद्यमान स्थिती पाहिली तर आपल्या लक्षात येते की, ज्या १०६ हुतात्म्यांनी महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी आपले आयुष्य पणाला लावले त्या हुतात्म्यांच्या स्वप्नांची पूर्ती अद्यापही झालेली नाही. सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सोहळा साजरा करणे ही गोष्ट सोपी असली तरी विद्यमान सरकार तिचे समर्थन करू शकणार नाही. कारण हा सोहळा साजरा करण्यासाठी जी नैतिक ताकद असायला हवी ती या सरकारकडे दिसत नाही. याच काय, आधीच्या सर्वच शासकांनी महाराष्ट्राच्या उन्नतीसाठी, सर्वांगीण विकासासाठी प्राण पणाला लावलेले दिसत नाहीत. म्हणूनच दुर्दैवाने आज महाराष्ट्र आपले महानपण हरवताना दिसतोय आणि महाराष्ट्राच्या तुलनेत मागे असलेली राज्ये सर्वांगीण प्रगती करताना दिसतात. अर्थात ती राज्येसुद्धा आपल्या देशाचाच अविभाज्य घटक आहे. त्या राज्यांमध्ये मराठी लोकांचे कमीअधिक प्रमाणात वास्तव्य आहे. त्यामुळे आपण त्यांच्याबद्दल असूया बाळगणे योग्य नाही. परंतु राज्यातील बहुतांश जनता अंधःकारात असेल आणि आमचे निलाजरे सत्ताधारी सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने दिवाळी साजरी करू इच्छित असतील तर त्याच वेळी निषेधही होणे आवश्यक आहे. सध्याचा महाराष्ट्र हा समर्थ, संपन्न किंवा स्वयंपूर्ण

नाही. सध्याचा महाराष्ट्र हा कर्जाच्या ओझ्याने वाकलेला महाराष्ट्र आहे. सध्या राज्यावर १,८५,८०१ कोटी इतके कर्ज आहे. या कर्जांनी महाराष्ट्राच्या विकासचक्राला खीळ घातली आहे. कोणे एके काळी महाराष्ट्र राज्य विकासात अग्रेसर असणारे राज्य म्हणून ओळखले जात होते. विद्यमान स्थितीत महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व विकासकामे बंद पडली आहेत. २००३-०४ च्या आर्थिक वर्षात महाराष्ट्रावरील कर्ज ९७,६७४ कोटी होते. अवघ्या सहा-सात वर्षांतच ते कर्ज जवळ-जवळ दुप्पट झाले, याचा अर्थ महाराष्ट्रात फार मोठी क्रांती घडली असे नाही. कारण हे बहुतांश कर्ज आधीच्या कर्जावरील व्याज फेडण्यासाठी आणि अनुत्पादक कामांवर खर्च करण्यासाठी वापरले गेले. म्हणूनच विदर्भातील शेतकऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र कर्जाच्या दलदलीत फसलेला आहे. त्याला बाहेर काढण्यासाठी एका समर्थ नेतृत्वाची आज गरज निर्माण झाली आहे. शिवपूर्व काळात ही जी गोंधळाची स्थिती महाराष्ट्राने अनुभवली, उत्तर पेशवाईत ज्या दैन्याचा महाराष्ट्राने सामना केला त्याहून कितीतरी पट भीषण परिस्थिती आज आपल्या अवतीभोवती दिसत आहे. दुर्दैवाने, त्याकडे पाहण्याचे सोडा, त्याची दखलही घेण्याचे सौजन्य सत्ताधारी दाखवत नाहीत. विरोधकांना त्यांच्या मर्यादेपलीकडे काम करण्याचे भान उरले नाही. बुद्धिमंतांना आकडेवारीत परिघापलीकडे दिसत नाही. विचारवंतांना दिवाणखान्याच्या बाहेर पडावेसे वाटत नाही. लेखक-कवींना कल्पनाविश्वाचा मोह इतका पडला आहे की, आपल्यासमोर झिजून झिजून मरणारा शेतकरी किंवा प्राथमिक सोयीसुविधांअभावी कण्हतकुथत मरणारा आदिवासी बांधव दिसत नाही. हेच आजच्या महाराष्ट्राचे भीषण वास्तव आहे.

या दाहक वास्तवाचे चटके गावखेड्यातील जनता सोसते. गेल्या वीस वर्षांत महाराष्ट्रातील; प्रामुख्याने विदर्भातील दोन लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या आत्महत्यांमागील विविध कारणे नेहमीच चर्चिली जातात. परंतु आमचे सरकार आजवर त्या आत्महत्यांचा बंदोबस्त करू शकलेले नाही. कारण त्यांचे हात बांधलेले आहेत. सत्ताधारी मग ते कुठल्याही राजकीय पक्षाचे असोत, त्यांना मराठमोळ्या शेतकऱ्यांपेक्षा सावकार आणि दुकानदारांचे हित नेहमीच महत्त्वाचे वाटते. आजही अगदी तीच परिस्थिती आहे. म्हणून दर दिवशी, फार तर एक दिवसा आड, विदर्भातील शेतकरी विष पिऊन, फास लावून मरताना दिसतो. त्याउलट, शेतकऱ्यांच्या मृत्यूला कारणीभूत असलेले विदर्भातील सावकार त्यांच्या चक्रवाढ व्याजातील गतीप्रमाणे दिवसेंदिवस गब्बर होताना दिसतात. एके काळी समृद्ध असणाऱ्या विदर्भभूमीत शेतकऱ्यांना कमी दर्जाचे बियाणे आणि खतपुरवठा करणाऱ्या स्थानिक व्यापारांचे तण इतके माजले आहे की, सामान्य शेतकऱ्यांचा श्वास घुसमटू लागला आहे. तरी शासकीय पातळीवरून त्या संदर्भात कुठलीही ठोस भूमिका घेतली जात नाही. उलट, शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांचा अवमान करण्याचे पाप आजवरच्या सरकारने केले आहे.

गेल्या पंधरा वर्षांतील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा अभ्यास करणारे शासकीय अहवाल पाहिले तर आपल्या लक्षात यते की, या आत्महत्यांना आपण जबाबदार नाही हे दाखवण्यासाठी तमाम शासकीय यंत्रणा धडपडत असते. काय असते त्या शासकीय अहवालात? एकच निष्कर्ष - शेतकऱ्यांची आत्महत्या एक तर दारूच्या व्यसनापायी होते, कौटुंबिक तणावापायी होते, मानसिक संतुलन बिघडल्याने होते आणि कधी कधी त्या अहवालात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसाठी सावकार किंवा पठाणाप्रमाणे पैशांसाठी तगादा लावणारे बँकेतले लोक कारणीभूत असल्याचा निर्वाळा दिला जातो. कोणत्याही शासकीय यंत्रणेला 'वऱ्हाड ही सोन्याची कुऱ्हाड' असे नामाभिधान प्राप्त झालेल्या वऱ्हाड-विदर्भातील शेतकऱ्यांची आजची अवस्था महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर का झाली, असा प्रश्न पडताना दिसत नाही. विशेष म्हणजे आम्ही शेतकऱ्यांची मुले आहोत, आम्हाला शेती समजते किंवा आम्ही देशाचे कृषिधोरण ठरवतो असे म्हणणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांची ही दयनीय अवस्था केली आहे. त्यातून तो कसा बाहेर पडेल याची चिंता मात्र कोणीच करताना दिसत नाही.

शेतकऱ्यांच्या पाठोपाठ सर्वाधिक गांजला गेलेला वर्ग म्हणजे महाराष्ट्राच्या १५ जिल्ह्यांमध्ये वसणारा आदिवासी समाज. पूर्वी जंगलाच्या आधारावर जगणारे, आपल्या मनगटातील जोरावर आणि बुद्धिमत्तेच्या बळावर निसर्गाच्या साथीने जगणारे आदिवासी स्वातंत्र्यानंतर सबसीडीच्या आधारावर जगू लागले. त्यांच्यातील मूठभर लोकांनी नेतृत्वाची धुरा आपल्या हातात घेऊन तमाम आदिवासी समाज शोषकांच्या हाती दिला. आज महाराष्ट्रातील आदिवासी मुले जन्मतःच मृत्यूच्या कराल दाढेत जाताना दिसतात. कारण या सरकारकडे या दुर्लक्षित समाजाचे उत्तरदायित्व सोपविले आहे आणि या सरकारकडून मात्र त्यांच्याकडे सरळसरळ दुर्लक्ष केले जाते. प्रसिद्ध विचारवंत खलील जिब्रान यांनी एका ठिकाणी लिहिले आहे, 'झाडावरील एक पानसुद्धा संपूर्ण झाडाची संमती असल्याशिवाय गळून पडत नाही.' आपल्या राज्यात मात्र शेकडो नव्हे हजारो बालकांचा अकाली मृत्यू होतो आणि सरकार म्हणवणारे आमचे सत्ताधारी याकडे गांभीर्याने पाहत नाहीत. नुकत्याच झालेल्या विधीमंडळ अधिवेशनात सरकारच्या निर्ढावलेपणाचे धक्कादायक दर्शन घडले. मेळघाट-धारणी परिसरातील आदिवासी बालकांच्या कुपोषणाच्या मुद्यावरून चाललेल्या चर्चेमध्य सरकारकडून जे निवेदन देण्यात आले, त्या निवेदनात बालमृत्यूच्या प्रमाणात अंशतः वाढ झाल्याचे मान्य केले गेले. विशेष खेदाची गोष्ट म्हणजे, सबंध जग २१व्या शतकातील

सोयीसुविधा जगातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोचाव्यात अशी चर्चा करत असताना, भारत एक जगातील महासत्ता बनण्याची भाषा करत असताना आमच्या राज्यात मात्र कोवळी पानगळ सुरू आहे आणि आमचे सत्ताधारी महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवाच्या सोहळ्यात मग्न आहेत! हे दृश्य अंगावर शहारे आणणारे आहे. कारण या सुवर्णमहोत्सव वर्षातच महाराष्ट्रात २७५८० बालमृत्यू झाले आहेत. दुर्गम आदिवासी भागातील दवाखान्यांमध्ये डॉक्टर नाहीत, नर्स नाहीत, औषधे नाहीत अशी परिस्थिती आहे. तरीही महाराष्ट्र फार प्रगती करत आहे असा डांगोरा पिटण्यासाठी आमचे राज्यकर्ते धडपडत आहेत.


महाराष्ट्रातील अशा एक ना अनेक समस्यांचा आढावा इथे घेता येऊ शकतो. या समस्यांनी अवघा मराठी समाज गांजून गेला आहे. शेतीवर आधारलेल्या मराठी समाजाला आर्थिक जाचाबरोबर भीषण रुढी-परंपरा, अंधश्रद्धा आणि मागासले-पणाचे ग्रहण लागले आहे. अगदी तीच परिस्थिती शहरी भागातील शोषित आणि वंचितांची. प्राथमिक शिक्षण, प्राथमिक आरोग्य, दोनवेळचे जेवण आणि साधा निवारा नशिबी नसणारा हा दीनदुःखितांचा वर्ग दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. त्याचवेळी समाजात श्रीमंतीचे प्रमाणही अफाट वेगाने वाढताना दिसते. या सगळ्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राची स्थिती दयनीय करण्यासाठी आणखी एक गोष्ट कारणीभूत ठरली ती म्हणजे आपल्याभोवती दाटत चालेला अंधार. एकेकाळी भरपूर उर्जानिर्मितीसाठी महाराष्ट्र ओळखला जात होता. जास्त ऊर्जानिर्मिती झाल्यानंतर आमच्या संयत्रांमधून, विद्युतजनित्रामधून जादा वीज गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, काही वेळा कर्नाटकालासुद्धा दिली जात होती. परंतु गेल्या पंधरा वर्षांत महाराष्ट्रात एक मेगावॅटपेक्षा जास्त नव्या कविजेचे उत्पादन झालेले नाही. त्यामुळे राज्यात कधी नव्हे एवढा अभूतपूर्व वीजतुटवडा निर्माण झाला आहे. सध्या राज्याच्या गरजेनुसार पाहिले तर ५५०० मेगावॅट विजेचा तुटवडा असल्याचे जाणवते. भारनियमनाची मर्यादा ग्रामीण भागात १४ वरून १६ तासांवर नेण्यात आली आहे. अगदी शहरी भागातही भारनियमन अत्यावश्यक बनत चालले आहे. सबंध महाराष्ट्रच अंधःकाराच्या गर्तेत लोटला जात असताना आमचे सरकार मात्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त भव्य लेझर शो करताना दिसते. त्यांच्या या वैभवाच्या दीपत्कारामुळे काळोखात लोटल्या गेलेल्या मराठी जनांचे डोळे दिपून जातील. सामान्य माणसाचे जाऊ द्या, पण थोडाफार विचार करणाऱ्या विचारी वर्गाने राज्याची स्थिती लक्षात घेतली पाहिजे. विजेच्या अभावी कारखाने बंद पडतात. एमआयडीसीमधील युनिट्सना टाळे ठोकले जात आहे. नव्याने शहरीकरणाच्या प्रभावाखाली येणाऱ्या गांवांमध्ये आता बेकारीचा भस्मासूर गुन्हेगारीच्या नवनव्या अपत्यांना जन्माला घालतोय. वीज टंचाईच्या पाठोपाठ आलेली पाणीटंचाई इतकी जीवघेणी बनत चालली आहे, की एप्रिल महिन्यातच राज्यातील हजारो गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. पाणीटंचाईमुळे आणि वीजटंचाईमुळे मुलांच्या अभ्यासावर, घरातील लग्नकार्यांवरच नव्हे; एकूण लोकांच्या राहणीमानावार प्रचंड परिणाम होताना दिसतोय. तरीही महाराष्ट्रात अद्याप असंतोषाचा उद्रेक झालेला नाही. महानुभाव संप्रदायाचे संस्थापक चक्रधरस्वामी हे गुजराती भाषिक होते. महाराष्ट्रात आल्यानंतर त्यांनी आपल्या धर्मकार्यात मराठी भाषेला अंगीकारले आणि संस्कृतऐवजी मराठीला भाषेचा दर्जा दिला. त्यावेळी, तेराव्या शतकात आपल्या शिष्यांना उपदेश करताना चक्रधरस्वामींनी म्हटले होते, 'महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र, महाराष्ट्री वसावे'. आज मात्र महाराष्ट्रातील उद्योगव्यवसाय महाराष्ट्राच्या भूमीतून बाहेर जाताना दिसतात. महाराष्ट्रातील स्वार्थांध, झापडबंद राजकारण्यांच्या अनास्थेमुळे राज्याच्या विकासाला उपकारक ठरणारा अमराठी वर्ग महाराष्ट्रातून बाहेर जाताना दिसत आहे. या सगळ्याचे आज जेवढे परिणाम जाणवत आहेत त्यापेक्षा कितीतरी पट अधिक भीषण परिणाम नजीकच्या भविष्यात दिसायला लागतील. तोपर्यंत या सुवर्णमहोत्सवाची सोनझळाळी उतरलेली असेल आणि महाराष्ट्राच्या डोक्यावरील कर्जाचा आकडा शेतकऱ्यांच्या आत्महत्येप्रमाणे, कुपोषणाने मरणाऱ्या आदिवासी बालमृत्यूप्रमाणे दिवसेंदिवस वाढत जाईल. त्यामुळे आपण सर्वांनी वेळीच जागे होण्याची गरज आहे. हा महिना सुवर्णमहोत्सव साजरा करण्याचा असला तरी त्यामध्ये येणाऱ्या रात्री अनंत समस्यांचे हात असलेल्या काळरात्री आहेत. त्यांना आपल्या घरापर्यंत येऊ द्यायचे नसेल तर राज्यातील विचारवंत आणि बुद्धिमंतांनी 'आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान' ह्या जोशात पुढे यण्याची गरज आहे. महाराष्ट्राला एक शिवबा नकोय, घराघरात मावळे जन्मायला हवेत. महाराष्ट्र या संकटातूनही तरून निघेल.

**महेश म्हात्रे**

maheshbmhatre@gmail.com

**लालबाग**

**आदिनाथ हरवंदे**



**गेल्या आठ दशकांचा सामाजिक इतिहास साकारलेला हा ग्रंथ**

**मूल्य ४०० रुपये**

**सवलतीत २०० रुपये**

# दयनीय चित्र

## रघवीर कुल

यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राचा मंगलकलश आणल्यानंतर गेल्या पन्नास वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये कलेच्या प्रांताकडे दुर्लक्ष करण्याचा कळस झाला आहे.

सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये शासन आणि बुद्धिवंत यांच्या योगदानाबद्दल काय बोलायचे? बुद्धिवंत म्हणजे संपादक आणि प्राध्यापक मंडळी असतात असा गैरसमज यशस्वीरीत्या पसरवला गेला आहे. अर्थात या बुद्धिवंतांनी समाजात काय महत्त्वाचे बदल घडवले हा संशोधनाचा विषय आहे.

आपल्यापुरते बोलायचे झाले तर एक कलावंत म्हणून आपण कलेच्या दुर्दशेबद्दल बोलू शकतो. अर्थात कलेच्या प्रांताबद्दल गैरसमजच जास्त आहेत. तेही अगदी शालेय जीवनापासून शाळेच्या फळ्यावर चित्र काढणारे चित्रकला मास्तर आणि मैदानावर पीटीचे मास्तर यांची उपयुक्तता फक्त गॅदरींगच्या वेळी डोळ्यांत भरणारी असे. तसे त्यांना दुय्यमच स्थान असे. तीच मनोभूमिका आजच्या माध्यमांपर्यंत झिरपलेली आहे. एखाद्या महत्त्वाच्या विषयावर सामाजिक समस्येवर तिसऱ्या दर्जाच्या मालिकांचे नट, नट्यांचे अभिप्राय विचारले जातात. पण एखाद्या नामवंत चित्रकाराला विचारले गेल्याचे आठवत नाही. कारण चित्रकाराला बुद्धिवंत मानण्याची प्रथाच महाराष्ट्रात नाही.

मॅट्रिक नंतर जे.जे. मध्ये जाणार म्हटल्यावर तमाम नातेवाईकांनी 'काय भिकेचे डोहाळे लागले आहेत?', 'छत्रीवर नाव घालत फिरणार का?' म्हणून अभिप्राय दिले होते. 'चांगला इंजिनिअर वगैरे हो. नाहीतर व्ही.जे.टी.आय.ला जा. नोकरी कर. तेही नाही जमलं तर कोपऱ्यावर एक लेथ मशीन टाक. खायचे वांधे नाही होणार' असे शेरे. म्हणजे कलाकार गॅरेजवाल्यापेक्षा गया गुजरा.

शंकर पळशीकर यांनी ध्वनिसारख्या अमूर्त संकल्पनेला चित्रात पकडण्याचा प्रयत्न केला. प्रभाकर बर्वे कॅनव्हासवर आकाराच्या रेषांच्या, पोताच्या प्रयोगात रमलेले होते. सातवळेकर रंगाच्या ताजेपणाचा वेध घेत होते. असे स्वयंभू अनेकजण आपापल्या परीने बुद्धिवंतच होते. समाजाचे चित्रधन समृद्ध करत होते. पण आपला समाजच 'व्हिज्युअल लिटरेट' नाही त्याला काय उपाय?

आजकाल कॉम्प्युटर लिटरेट असणे गरजेचे झाले आहे, तसे 'व्हिज्युअल लिटरेट' होणेही महत्त्वाचे आहे आणि हे काम शासनाने ठरवून समजून उमजून करावयाला हवे. कारण कला नेहमीच राजाश्रयावर जगली आहे.

महाराष्ट्र शासनाकडे दीडशे वर्षांची परंपरा असलेली जगविख्यात जे.जे. स्कूल ऑफ आर्टसारखी संस्था आहे. तिच्या परिसरात सातवळेकर, सडवेलकर, पळशीकर, आडिवरेकर यांच्यासारखे दिग्गज वावरत होते. ते गेल्यानंतर चुकीच्या शासकीय आरक्षणाच्या, कोटयांच्या धोरणामुळे, ज्यांना साधी सरळ रेषा आखता येत नाही असे कारागीर मास्तर म्हणून भरती झाले तर काय लक्तरे होतील संस्थांची ती झाली आहेत. अमूल्य पेंटिंगच्या ठेव्याची वाताहत झाली आहे. अशा अनेक दुःखद गोष्टी आहेत, ज्याची पूर्ण जबाबदारी शासनाची आहे. शासन यात सपशेल नाकाम आहे.

कलाकार 'जातिवंत' असतो. या क्षेत्रामध्ये नुसते येते, समजते, जमते असे म्हणता येत नाही. करून दाखवावे लागते. ते चित्र असो, शिल्प असो. एवढेच कशाला. अभिनय, गायन, नर्तन, या कलांना सुद्धा हा नियम लागू होतो.

इथे बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर हा एकच नियम.

> नुकतेच जे.जे. स्कूल ऑफ आर्टच्या परिसरातील इमारती हेरिटेज बिल्डिंगज् म्हणून घोषित केल्या गेल्या आणि लाखो रुपये खर्च करून स्वच्छ केल्या गेल्या. परंतु सौंदर्यशास्त्र शिकवणारे मास्तर मात्र या इमारतीमध्ये नाहीत. विद्यार्थी आहेत पण त्यांना आशियामधील सर्वोत्तम लायब्ररीमध्ये पाऊल टाकावेसे वाटत नाही. तसे त्यांना शिकवणारेच कोणी नाहीत. हे सौंदर्यीकरण म्हणजे मृत शरीराला सजवण्यासारखे आहे. पैसा असून तो योग्य ठिकाणी वापरला जात नाही. वापरण्याची कुवत नाही.
>
> याच दीडशे वर्ष जुन्या इमारतीचा विस्तार म्हणून बांधलेली सहा मजली इमारत पालिकेच्या कुठल्याही शाळेपेक्षा वेगळी नाही. वास्तुशास्त्र! सौंदर्य!! ते काय असते?

आपल्याच राज्यात अजंठा-वेरूळ आहे. हेमाडपंती मंदिरांची परंपरा आहे. गरज होती म्हणून बांधलेले गड, बुरूज, गढ्या आहेत. पण त्यांची देखभाल करण्याबाबत अनास्था पण भरपूर आहे ना! गरजेपुरते हातपाय पसरवण्याचे आपले कोतेपण शासनात उतरले नाही तरच नवल.

लिओ टॉलस्टॉयच्या मालकीच्या जमिनी एवढ्या शेकडो एकर जमिनी आजही विदर्भ, मराठवाड्याच्या जमीनदारांकडे

आहेत. तरीही त्यांची घरे खुजी आणि बायकांचा जन्म धुराने भरलेल्या काळ्या स्वयंपाकघरात जातो.

लिओ दिवसात पाच पाच ड्रेस बदलून राजेशाही आयुष्य उपभोगत जागतिक कीर्तीच्या कलाकृती आस्वादत होता. आमच्याकडे एखादे पेंटिंग सुद्धा कुणी घेतल्याचे ऐकिवात नाही.

एखादा पंढरपूरचा हुसेन आणीबाणीवर प्रतिक्रिया म्हणून पेंटिंग करतो आणि भलत्याच कारणाने तडीपार होतो.

गायतोंडेसारखा प्रतिभावान दिल्लीत बेवारश्यासारखा भणंग अवस्थेत राहतो.

आपल्या समाजाच्या आणि शासनाच्या बौद्धिक दिवाळखोरीची ही लक्षणे आहेत.

नाही म्हणायला मूर्तिकलेमध्ये मराठी कलाकारांचे काम भारतभर दिसते. सोनावडेकर, करमरकर, भावे जागोजागी दिसतात. नवीन पिढीतील कापुसकर, भगवान रामपुरे आपले अस्तित्व टिकवून आहेत. कुठल्याही कारणाने का होईना पण मायावती सरकार चार हजार कोटी रुपयांची मूर्तिकलेची कामे काढते आणि महाराष्ट्राच्या विधानसभेच्या दारात उभा असलेला महात्मा फुले यांचा शैलीदार पुतळा अर्धवट स्थितीत असतो. त्याच्यासोबत उभे राहणारे महाराष्ट्रातील धुरीणांचे पुतळे निधी अभावी पूर्ण होत नाहीत ही लाज वाटावी अशी घटना आहे. आपण सुवर्णमहोत्सव कसला साजरा करतोय?

मूर्तिकलेला बरे दिवस येण्यामागे लोकमान्य टिळकांनी गणेशाला सार्वजनिक केला. त्याचा बराच फायदा झाला. गावोगावी मूर्ती घडवणारे कारागीर तयार झाले. त्यातील बरेच छापाचे गणपती करणारे असले तरी काही कलाकार मातीशी खेळत आकार देत आपली अभिव्यक्तीही साकारू लागले. त्यातूनच आजचे अनेक नामवंत मूर्तिकार उदयाला आले. हाही मोठा फायदा म्हणायचा.

परवा मुख्यमंत्री म्हणाले, त्यांच्या कॉलेजजीवनापासून ते मुंबईच्या जलवाहतुकीबद्दल ऐकत आहेत. त्यावरून आठवले, माझ्या कॉलेजजीवनामध्ये म्हणजे ७०च्या दशकात मी जे.जे. मध्ये ॲनिमेशन टेबल येणार म्हणून ऐकत होतो. अजूनही आलेले नाही. शासनाच्या अनास्थेचे किती पुरावे द्यायचे? आधीच छोट्या आकाशात राहणारा मराठी माणूस (कलाकार) वैश्विक क्रांतिनंतर अधिकच छोटा होऊ लागला.

जाहिरात क्षेत्रामध्ये स्थानिक सण म्हणजे दिवाळी, दसरा, गुडीपाडवा, पोळा यांच्या जाहिरातीशिवाय फारसे काही करण्यासारखे सृजनशील कलावंतांना उरलेले नाही. बऱ्याच जाहिरात मोहिमांच्या कल्पना आणि पॉझिटिव्हज् परदेशातूनच येतात. याही क्षेत्रामध्ये प्रतिभावान मराठी कलाकार असूनसुद्धा इलेक्ट्रॉनिक माध्यमासमोर अ महाराष्ट्रीय चेहरेच दिसतात. अपवाद एखाद्या भरत दाभोळकरचा. मुंबईसारख्या शहरात मराठी चित्रपटांना सापत्न वागणूक मिळते आणि मोबाईलवर मराठीत सूचना मिळवण्यासाठी शोरूम फोडाव्या लागतात हे कोणाचे अपयश आहे?

चित्रपटांच्या बाबतीत ही तेच. पूर्वीची करसवलतीची योजना निर्मात्याला झुकते माप देणारी होती. कला, बुद्धिवंत नेहमीप्रमाणे गौण. त्यानंतरच्या अनुदान योजनेनंतर काँग्रेसी गवत यावे तसे वर्षाकाठी ८० ते ९० चित्रपट तयार झाले अर्थात ते दाखवण्यासाठी थिएटर नाहीत. चित्रपट बघण्याच्या लायकीचे आहेत की नाहीत हा दुसरा मुद्दा.

त्यांच्या अनुदानाच्या रकमा तुंबलेल्या कारण बजेटमध्ये तरतूद कमी.

जे काही सिनेमे ऑस्करपर्यंत गेले ते खाजगी प्रयत्नामधून उभे राहिले होते. परेश मोकाशी त्याला हवी तशी फिल्म काढावयाची म्हणून घर गहाण टाकतो. यात शासनाचा काडीचा सहभाग नाही. तिरंगा फडफडला वगैरे घोषणा द्यायला मंत्री, सरकार तयार! खरंतर आपण शासनावर फार भरवसा ठेवतो किंवा अवास्तव अपेक्षा करतो!

कर्जमाफीच्या आशेवर जगणारा आणि आत्महत्या करणारा शेतकरी आणि बुद्धिवंतांची ही 'बौद्धिक' हाराकिरी यात काहीच फरक नाही. आपण कसली पन्नाशी साजरी करतोय? आत्महत्यांची की हाराकिरीची?

> यशवंतराव चव्हाण यांनी मराठी चित्रपट पारितोषिक वितरण सोहळा दरवर्षी ३० एप्रिल तारखेला चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांच्या स्मृतिदिनी करण्याचे ठरवले आणि बरेच वर्षे ही परंपरा चालू राहिली. मात्र मागील काही वर्षांपूर्वी हा सोहळा २७ एप्रिलला होतो. कारण???
>
> ३० एप्रिलला रात्री जागरण झाल्यावर १ मे रोजी महाराष्ट्रदिनी मंत्र्यांना सकाळी सकाळी कार्यक्रमांसाठी उठण्याला उशीर होतो!
>
> फाळक्यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य गेले XXXX!
>
> फाळके तुम्ही चुकून महाराष्ट्रात जन्मलात. युरोपात असता तर तुमच्या नावाने मोठे म्युझियम, फिल्म अकाईव्ह उभे झाले असते. अनंत ठिकाणी खड्डे आणि आजूबाजूला झोपडपट्ट्या नसलेले रस्ते झाले नसते.

मुळात मराठी माणसाची वृत्ती उपजीविकेची असते. त्यामधील 'उप' महत्त्वाचा, खाण्यापिण्यासाठी लागणाऱ्या पैशासाठी केलेली ती 'उपजीविका'.

खरे तर 'उप' दुय्यमच. अस्सल जीवन हे तत्त्वज्ञानाचे, कलेचे, संगीताचे भान ठेवत, आनंद घेत, रसग्रहण करत राहण्याचे. पण आपण त्याच्याबाबत गल्लत केलेली आहे.


माझ्या एका फ्रेंच मित्राने माझ्या मुलीला भारतात आल्यावर विचारले होते काय करतेस? तेव्हा ती उपजीविकेबद्दल सांगू लागली. तेव्हा त्याने तिला थांबवत विचारले, मी तू काय करतेस हे विचारतोय? गातेस का? गिटार, बासरी, सतार वगैरे काही वाजवतेस का? चित्र काढतेस का? नाच

# दोन ताजी प्रकाशने - वृत्तांत

## पंखाविना भरारी

''शारीरिक व्यंग असलेल्या आपल्या मुलाच्या आयुष्याला पैलू पाडणाऱ्या घाडी दापंत्यासारखे पालक निर्माण होण्याची गरज आहे.'' असे अनुराधा एकनाथ ठाकूर यांनी 'पंखाविना भरारी' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात सांगितले. ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ १८ एप्रिल २०१० रोजी झाला. मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते प्रकाशन झाले. यावेळी शिक्षण संचालक विजयशीला सरदेसाई, नाट्यशालेच्या कांचन सोनटक्के, दिग्दर्शक परेश मोकाशी, प्रसादचे आई-वडील शरयू व नागेश घाडी मंचावर उपस्थित होते.

शरयू घाडी यांनी प्रास्ताविकात पुस्तक लिहिण्यामागची भूमिका सांगितली. ''शरीर साथ देत नसतानाही प्रसादने जिद्दीच्या बळावर शिक्षण, चित्रकला, संगीत यात यश मिळविले. प्रसादच्या वाढदिवसाला हे पुस्तक प्रसिद्ध करायचे हे ठरविले होते. माझे स्वप्न पूर्ण झाले नाही. ''सध्या विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. मानसिक न्यूनगंडामुळे हे घडते. हे पुस्तक वाचल्यावर



अशा अनेक विद्यार्थ्यांना व पालकांना प्रेरणा मिळेल'' असे डॉ. स्नेहलता देशमुख यांनी सांगितले. गर्भसंस्कार हा त्यांचा अभ्यासाचा विषय आहे. ''अव्यंग मूल जन्माला येण्यासाठी काही उपाय करता येतात असे काही प्रयोगातून यश मिळाले आहे. तरीही ते पूर्णत्वाने यशस्वी झाले आहेत असे म्हणता येणार नाही. प्रसादला सांभाळण्याची जबाबदारी केवळ पत्नीवर न सोपवता ती जबाबदारी घेणारे नागेश घाडी हे स्त्रीपुरुष समानतेचे उत्तम उदाहरण आहे,'' असे त्यांनी सांगितले.

''आपल्या व्यंगाचा बागुलबुवा न करता जीवनाचा प्रत्येक क्षण प्रसाद आनंदाने जगला. विनोद बुद्धी जागृत असलेला प्रसाद आपल्या कायम स्मरणात राहील'' असे घाडी कुटुंबीयांचे स्नेही परेश मोकाशी यांनी सांगितले. हरिश्चंद्राची फॅक्टरी हा माझा सिनेमा रडका तर नाही ना? असे प्रसादने मला विचारल्याची आठवण त्यांनी सांगितली.

प्रसादचे संगीताचे गुरू प्रदीप जोशी यांनी सांगितले की प्रसादचे आयुष्य म्हणजे एक गाथा होती. दहा ते बारा वर्षे मला त्याचा सहवास लाभला. या पुस्तकाच्या रूपाने आपणा सर्वांना ही गाथा वाचण्यास उपलब्ध झाली आहे. प्रसादचे चित्रकलेचे शिक्षक दिगंबर चिचकर यांनी प्रसादने चित्रकलेत कसे यश मिळविले हे सांगितले. त्याने अनेक चित्रांतून असा संदेश दिला आहे की आपल्या अपंगत्वात निराशेला थारा देऊ नये. 'मी तुझ्या हृदयाशी आणि तू माझ्या हृदयाशी' हीच भावना प्रसादविषयी त्याचे असणारे नाते सांगून जाते. प्रसादचा सुमारे पावणेचार वर्षे सहवास लाभलेले सूर्यकांत जाधव म्हणाले, आयुष्याला सामोरे जाताना सकारात्मक

---

**(पान २२ वरून)**

शिकतेस का? सोमवार ते शुक्रवार ऑफिसच्या रगाड्यानंतर वीकएन्डला काय करतेस? कारण ते खरे जगणे! आम्ही पॅरिसच्या म्युझियममध्ये गेलो तर कोणती चित्रे बघायची आणि का बघायची? कशी बघायची हेच आम्हाला माहीत नसते. एक मोनालिसा माहीत असते पण तिला तरी का डोक्यावर घेतात हे कळत नाही.

त्याच्या उलट त्याच म्युझियममध्ये फ्रेंच शाळांतील लहान लहान मुलांना चित्र कसे बघायचे, कोणत्या अँगलने बघायचे, किती अंतरावरून बघायचे, शांतपणे नोट्स कशा काढायच्या हे त्याची मास्तरीण शिकवताना दिसते. हेच खरे जीवनाचे बाळकडू.

पन्नास वर्षांत आपण शासनावर अधिकाधिक अवलंबून राहू लागतो ही आपली चूक. शासन आणि राजकारणी यांच्याशिवाय आपले पान हालत नाही ही स्थिती फार वाईट आहे. तेव्हा राजकारणी त्यांच्या सोयीनुसार, मगदुरानुसार आपल्या माथी गोष्टी मारत राहणार. सार्वजनिक ठिकाणी फिरण्यासाठी बाग हवी तर आपल्याला पुढारी लागतात. खेळण्याच्या रिकाम्या जागा, मैदाने वाचवण्यासाठी आंदोलने करावी लागतात. याच नगरभक्षकांशी भांडावे लागते.

खरेतर बुद्धिवंतांनी यांच्याकडून समाजाच्या भल्यासाठी, उन्नतीसाठी कामे करवून घ्यायला हवीत. त्यांच्या मागे फरफटत जाणे बंद करायला हवे. पन्नास वर्षांत एवढी तरी 'बौद्धिक' पातळी वाढली तर बुद्धिवंतांनी काय दिले हे विचारण्याची वेळ येणार नाही. नाहीतर पुन्हा विचारावे लागेल, 'आपण कसला महोत्सव साजरा करतोय?'

**रघवीर कुल**
२०६-ए, विनीत टॉवर,
जुहू वर्सोवा लिंक रोड,
अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५३
फोन : २६३५५१७६, ९९३००२३२९९

दृष्टिकोन कसा असावा हे त्याच्यापासून शिकता आले. प्रसादच्या आईवडिलांमुळेच तो पंखाविना भरारी घेऊ शकला. शिक्षण संचालिका विजयशीला सरदेसाई यांनी आपल्या भाषणात सांगितले की ''बालभवन मध्ये जेव्हा कार्यक्रम होत असत त्यात प्रसादचा नेहमी कार्यक्रम होत असे. समाजात अनेक सदृढ व्यक्तींनी मानसिक विकलांगतेचा बुरखा पांघरला आहे. त्या सर्वांना प्रसादने आपल्या कृतीतून चोख उत्तर दिले आहे. आपल्या मुलात चैतन्य जागे ठेवायचे, तसेच आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत याचे भान ठेवुन जगण्यासाठी बळ द्यायचे याचे सुंदर उदाहरण म्हणजे प्रसादचे आईवडील यांचे वागणे.'' यावेळी त्यांनी पुस्तकात छापलेली प्रसादवरील कविता वाचून दाखविली.

नाट्यशालेच्या कांचन सोनटक्के यांनी आपल्या भाषणात सांगितले, प्रसादने प्रत्येक भेटीत आपल्याला आनंद दिला. लेखन, संगीतदिग्दर्शन व गायन ह्या तिन्ही क्षेत्रात प्राविण्य मिळवले. एकदा माझ्यावर व समुद्रावर त्वरित कविता करून तिला चाल लावून मला ऐकविली.

या कार्यक्रमात प्रसादचे काही मित्र-मैत्रिणी यांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन कौतुक करण्यात आले.

प्रसादचे जगणे, तसेच प्रसादचे आईवडील यांचे प्रयत्न हाच आपणा सर्वांना मिळालेला पुस्तकरूपी प्रसाद आहे अशी भावना सर्व वक्त्यांनी व्यक्त केली.

## जय हो!

सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर आंदोलने करून त्यांना कसा न्याय मिळवून देता येतो आणि प्रसंगी राज्यसत्ता देखील कशी बदलता येते हे 'जय हो!' या पुस्तकात सांगितले आहे. ज्येष्ठ समाजवादी नेत्या कमल देसाई यांच्या या आत्मकथनाचा प्रकाशन समारंभ २४ एप्रिल २०१० रोजी केशव गोरे स्मारक सभागृहात झाला. माझी गृहराज्य मंत्री भाई वैद्य समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. राज्याचे



गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. ज्येष्ठ समाजवादी नेत्या मृणाल गोरे व आय.बी.एन. लोकमत वृत्तवाहिनीचे संपादक निखिल वागळे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

कमल देसाई आपल्या मनोगतात म्हणाल्या, की ''सामाजिक कार्याची प्रेरणा मला माझ्या आईवडिलांकडून मिळाली. आजच्या तरुण पिढीकडे पाहिले की वाटते ते शरिराने नाही तर मनाने थकले आहेत. कंटाळा, आळस हे शब्द त्यांनी झटकून टाकावे. अन्यायाविरुद्ध लढत राहावे'' वयाच्या नव्वदाव्या वर्षी त्यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रत्येकाने पाच झाडे लावून ती जगवा, पाच जणांना कुटुंबनियोजन करण्यास उद्युक्त करा, पाच जणांना साक्षर करा तसेच रोज किमान एक तास समाजासाठी वा आपल्या आवडत्या कामासाठी खर्च करा.

''सध्याचे सत्ताधारी आणि विरोधक हे दोघेही जनतेपासून तुटले असून त्यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी आज पुन्हा सामाजिक व राजकीय आंदोलने होणे गरजेचे आहे. प्रसारमाध्यमांकडे समाजातील गैरव्यवहारांची जितकी प्रकरणे येतात त्यातील फक्त २० टक्केच आम्ही समाजापुढे नेतो. सर्व गैरव्यवहार दाखवल्यास आम्ही जिवंतच राहणार नाही'' असे निखिल वागळे यांनी आपल्या भाषणात सांगितले. ते पुढे म्हणाले, ''महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त सर्वच राजकीय पक्षांनी भंपक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र हे बुद्धिवंताचे राज्य आहे याबद्दल आपणाला विसर पडल्याचे जाणवते. स्वातंत्र्य लढ्यातील व विविध सामाजिक चळवळीतील निष्ठावंतांचे काम असेच पुस्तकरूपाने समाजापुढे आणले पाहिजे.''

गृहमंत्री आर. आर. पाटील भाषणात म्हणाले, ''मृणाल गोरे, कमल देसाई यांच्यासारख्यांनी केलेली आंदोलने प्रामाणिक हेतूने केली होती. गनिमीकाव्याने ते सरकारी अधिकारी व मंत्र्याना पकडत असत. त्यावेळचे मंत्री व अन्य सरकारी अधिकारी यांचे वर्तन सुसंस्कृत होते. आजची आंदोलने एखाद्या व्यक्तीला बदनाम करण्यासाठी सुपारी घेऊन केल्यासारखी असतात.

विविध चळवळीत काम केलेल्या कार्यकर्त्यांचे अनुभव चित्रित केल्यास किंवा पुस्तके प्रसिद्ध केल्यास सामाजिक, राजकीय इतिहास पुढील पिढीस उपलब्ध होईल.''

आपला देश शेतीप्रधान असतानाही आपण मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली हे सत्ताधाऱ्यांबरोबर विरोधकांनाही मान्य होते का? असा प्रश्न विचारून भाई वैद्य म्हणाले ''आज शिक्षण, आरोग्य या सेवा महाग झाल्या आहेत. राज्यात शेतकरी आत्महत्या करत आहेत. समाजात अपप्रवृत्ती वाढत आहेत. राजकीय पक्ष आणि नेत्यांनी सर्व सामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी उदासीनता दाखवत आहेत. तरीदेखील एक दिवस जनात उठाव करून राजसत्ता बदलून टाकेल.''

कमल देसाई यांच्या आत्मकथनाचे शब्दांकन करणाऱ्या नीलम शहा-नेरकर यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. ग्रंथालीच्या वतीने विनायक गोखले यांनी प्रास्ताविक केले. वसंत शिराली यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया जोशी यांनी केले.

# शब्दशस्त्राची चळवळ

## विनायक पात्रुडकर

गेल्या पन्नास वर्षातला महाराष्ट्र कुणी घडविला, असा प्रश्न जर आपण विचारला तर साहजिकच प्राथमिक स्तरावर राजकीय नेत्यांचे नाव डोळ्यापुढे येते. परंतु दऱ्याखोऱ्यात लपलेला महाराष्ट्र पुरोगामी करण्याचे, आधुनिकरणाची कास धरायला लावणारे, उद्योगात जवळपास पहिल्या क्रमांकावर या महाराष्ट्राला नेमके कुणी आणले. इतर राज्याच्या तुलनेने गेल्या पन्नास वर्षांची प्रगती नक्कीच वाखाणण्याजोगी आहे. गेल्या दहा वर्षात आपल्या देशातील इतर राज्यानीही उत्तम प्रगतीची वाट स्वीकारली आहे आणि ती यशस्वीही झाली आहे. कदाचित गुजरात, उत्तर प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू किंवा पर्यटनात केरळ अशा काही राज्यांनी गेल्या १०-१५ वर्षात खरोखरच लक्षणिय कामगिरी केली आहे. कदाचित त्यांच्या वेगामुळे महाराष्ट्राची प्रगती मंदावल्यासारखी वाटत असेल.

महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवाचा आनंद साजरा होत असतांना महाराष्ट्राची जी काही प्रगती झाली ती नेमक्या कोणत्या घटनांमुळे, व्यक्तीमुळे, विचारांमुळे झाली याचाही परामर्ष घेणे हे या टप्प्यावर औचित्याचे ठरणार आहे. महाराष्ट्राने शिक्षण, समाजकारण, अर्थकारण आणि अर्थातच राजकारण या सर्वच क्षेत्रात नेहमी पुढचे पाऊल टाकले. त्यातही पहिल्या पंचवीस वर्षात उद्योग आणि समाजकारण यात खरोखर भरीव कामगिरी केली. हे राज्य वैचारिकदृष्ट्या आग्रभागी असावे, कर्मठ संस्काराची पुटे मेंदुवरून घालविण्यासाठी इथल्या समाजधुरिणांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यांना कदाचित शंभर टक्के यश मिळाले नसेल तरी विचारांचा मार्ग स्पष्ट झाला. या मराठी मातीमध्ये गावागावांमध्ये कीर्तन, प्रवचन, निरूपण यांची दीर्घ परंपरा असल्याने लोकांशी थेट संवादाचे हत्यार उपलब्ध होते. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी गावागावात जे रान पेटविले गेले त्याचा परिणाम दिसून आला. या चळवळीच्या वेळी मनामनातून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ पेटावी यासाठी शब्दशस्त्राचा उत्तम उपयोग केला गेला. परंतु साक्षर लोकांपुरते हे शस्त्र स्तिमित राहते असाही अनुभव येतो.

मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याची घोषणा झाल्यानंतर जो जनप्रक्षोभ निर्माण झाला त्यामध्ये ही भावना मराठी माणसांच्या मनामनाच्या तळापर्यंत नेण्याचे काम आचार्य अत्रेंच्या लेखणीने केले. त्यांना वाणीचीही उत्तम साथ होती. त्यामुळे १९५६ ते १९६० पर्यंतच्या चार वर्षात आचार्य अत्रे यांनी 'मराठा'मधून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, .यासाठी जोरदार मोहीम चालवीली. अत्रेंना साथ मिळाली ती श्रीपाद अमृतडांगे, सेनापती बापट, एस. एम. जोशी, प्रबोधनकार ठाकरे, भाई माधवराव बागल आणि वा. रा. कोठारी यांची. वा. रा. कोठारीच्या 'प्रभात' मधूनही संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी पानेच्या पाने लिहिली गेली. अशोक पडबिद्री आणि दिनू रणदिवे यांनीही त्यावेळी आवेशपूर्ण लेखणीने चळवळीची धगधग कायम ठेवली. प्रबोधनकार ठाकरे यांनाही लेखणीबरोबर वाणीची उत्तम साथ होती. त्यामुळे त्याकाळात आंदोलन पेटते राहिले.

खरेतर जगाचा इतिहास पाहता विचारवंत, बुद्धिमंत माणसे नेहमी रस्त्यावरच्या चळवळीपासून दूर राहतात. परंतु डांगे, बापट, अत्रे, कोठारी अशी कितीतरी दिग्गज प्रखर बुद्धिमत्तेची नेतेमंडळी या चळवळीत सक्रिय सहभागी झाली होती. त्यामळे त्यांच्या विश्वासार्ह नेतृत्त्वाला गिरणी कामगारांची साथ मिळाली. विचारवंत हे मौखिक पातळीवर सीमित असतात. प्रत्यक्ष रस्त्यावर मात्र सर्वसामान्य मनुष्य असतो. जशी विचारवंतांची ही स्थिती तशीच मध्यमवर्गीयांची. आपल्या सुरक्षेच्या कवचामध्ये स्वतःला जोखाडून घेणारा मध्यमवर्गीय माणूस कुटुंब हेच विश्व म्हणून जगत असतो. सामाजिक भान जागं असलं तरी आपल्याला 'तोशीश' लागणार नाही याची काळजी घेण्यातच त्याचं आयुष्य जातं. त्यामुळे रस्त्यावरच्या लढ्यात याचाही फार कमी सहभाग असतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत म्हणूनच खऱ्या अर्थाने गिरणी कामगार रस्त्यावर उतरला. त्याचे डोळे दिपवणारे भव्य रूप पाहून तत्कालिन सरकारही हादरले होते. मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करण्यास पंडित नेहरू यांचा प्रचंड विरोध होता. त्यांच्यातच सूर मिसळून मोरारजी देसाई आणि स.का. पाटील यांची चिथवणारी वक्तव्ये येत होती. त्यामुळेच मराठी माणूस अधिक बिथरत गेला. १९५७च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र एकीकरण समितीला दैदिप्यमान यश मिळाले. त्यामुळे दिल्लीचा पवित्रा सौम्य होत गेला. अखेर लोकभावनांची दखल घेत १ मे १९६० मध्ये मुंबईसर महाराष्ट्राची घोषणा झाली. मात्र बेळगाव- कारवार महाराष्ट्रात सहभागी करून घेण्यास समितीला मर्यादा आल्या आणि गेली ५० वर्षे कर्नाटकाच्या हद्दीत राहून बेळगावचा मराठी माणूस महाराष्ट्राकडे तोंड करून बसला आहे. ती ठसठसती जखम घेऊनच गेली ५० वर्षे महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे.

पुरोगामी महाराष्ट्राची वाटचाल सुरू होता पहिल्या दशकात रोजगार निर्मितीचे मोठे आव्हान होते. कुणीही रोजगाराशिवाय राहणार नाही याची जबाबदारी सरकारची अशी भूमिका घेत १९६५ पासून महाराष्ट्रात रोजगार हमी योजना (रोहयो) राबविली गेली. ही वैशिष्ट्यपूर्ण योजना राबविणारे हे देशातले पहिले राज्य ठरले. विधानपरिषदेचे माजी सभापती वि. स. पागे यांना या योजनेचे प्रवर्तक मानले जाते. योजनच्या सुरुवाती-पासून ते २००७ पर्यंत रोह्योअंतर्गत तब्बल

सहा लाख कामे केली गेली. त्यातील ६० टक्के कामे ही मृदसंधारणाशी निगडीत होती. तशीच १० टक्के कामे जलसिंचनाशी संबंधित होती. त्यामुळे बेकारांची फार मोठी फळी निर्माण झाली नाही आणि अकुशल कामगारांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध झाला. महाराष्ट्राच्या खेड्या-पाड्यापर्यंत ही योजना पोहचली गेली आणि राबविली गेली. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्याही मुलभूत पायाभरणी या योजनेमुळे झाली. जसा रोह्योमुळे महाराष्ट्र प्रगतिपथावर गेला तसा अन्य काही क्रांतिकारी चळवळीमुळेही महाराष्ट्र पुरोगामी राज्य म्हणून ओळखले गेले. विशेषतः स्त्रीमुक्ती चळवळीमुळे महाराष्ट्राच्या प्रागतिक दृष्टीचे संदर्भ अधोरेखित झाले. स्त्री शिक्षण, स्त्री सुधारणा याबाबत १९७० नंतर महाराष्ट्रात स्त्रीवादी चळवळ अधिक सजग झाली. या दशकात आर्थिक प्रक्रियेतून स्त्रीयांवरील अत्याचाराची अनेक प्रकरणे उघडकीस आली. त्यामुळे स्त्री मुक्ती चळवळ उदयास आली. १९७५ हे वर्ष युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केल्यानंतर महाराष्ट्रवादी स्त्री संघटनांची नाळ थेट आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबर जोडली गेली. या काळात नारी समता मंच, स्त्री आधार केंद्र, मेन अगेन्स्ट व्हायोरन्स अँड अन्युज, स्त्री मुक्ती संघटना, महिला दक्षता समिती, क्रांतिकारी महिला संघटना कार्यरत झाल्या. गर्भलिंग चाचणीचा मुद्दा या स्त्रीवादी संघटनांनी उचलून धरल्याने १९८८ मध्ये गर्भलिंगपरीक्षण प्रतिबंध कायदा झाला. या चळवळीकडे केवळ सामाजिक अंगाने न पाहता महाराष्ट्राला चार पावले पुढे नेण्याचे काम या स्त्रीवादी संघटनांनी केले. ही चळवळ पुढे रेटण्यासाठी बायजा, प्रेरक, ललकारी, मिळून साऱ्याजणी अशी मासिकेही निघाली. स्त्रीवादी संघटनांची भूमिका पटवून सांगण्यासाठी या मासिकांचा उत्तम उपयोग केला गेला. मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, प्रमिला दंडवते ही समाजवादी स्त्रीयांची मोठी फळी राजकीय पटलावरही गाजली. जशी स्त्री वादी चळवळ महाराष्ट्रात रुजत गेली तशी स्त्री लेखिकाही सर्वसामान्य मराठी माणसापर्यंत पोहचत गेली. गौरी देशपांडे, कुमुदिनी रांगणेकर, कमल देसाई, मालतीबाई बेडेकर यांच्याबरोबरच दुर्गाबाई भागवत, इरावती कर्वे, विभावरी शिरुरकर यांचे बुद्धिप्रामाण्यवादी लिखाणही मराठी माणसांवर अधिराज्य करीत गेले. माजघरातल्या स्त्रीला वेशीवर आणून तिच्या भावना उत्तम शब्दात जगापुढे मांडल्या. १९६० नंतर महाराष्ट्रात जशी एकाबाजूने स्त्रीवादी चळवळ उभी राहिली त्याबरोबर दलित चळवळही एकिकडे मूळ धरत होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ नंतर दलित चळवळीला व्यापक पाया देण्याचा प्रयत्न केला. त्याच्यानंतर कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी भूमिहिनांसाठी दिलेला लढा गाजला. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी नामांतराचा लढाही मराहाराष्ट्रात गाजला. दलित पँथर संघटनेने हा लढा अधिक गतिमान केला होता. दलित साहित्याच्या माध्यमातूनही विद्रोहाच्या ठिणग्या पडत गेल्या. लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड अशी नवी लेखकमंडळी साहित्यावर ठसा उमटवून गेली. त्याचवेळी एकिकडे विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर या त्रिकुटांनी संपूर्ण महाराष्ट्रात धमाल केली. कविमनाचा मराठा माणूस या कवींनी अधिक संवेदनशील केला. महाराष्ट्राची खरी सांस्कृतिक चळवळ जशी कवींनी गाजविली तशी कथाकारांनीही पुल, वपु, शंकर पाटील, द. मा. मिरासदार या अशा दिग्गजांनी संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. सुरेश भटांच्या गझलांही मराठी माणसांवर तरळत राहिल्या. जयंत नारळीकर, अनिल काकोडकर, रघुनाथ माशेलकर या महारथींनी विज्ञानाच्या क्षेत्रात महाराष्ट्राचे नाव दुमदुमत ठेवले. बाबा आमटे आणि त्यांच्या पिढीनेही समाजसेवेचे व्रत आयुष्यभर घेऊन देशभर उत्तम आदर्श निर्माण केला. महामहोपाध्याय पां. वा. काणे यांच्या कर्तृत्त्वाला तर भारतरत्नाने सन्मानित करण्यात आले. वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्यावर लोक तुटून पडत. रणजित देसाईंच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांनीही मराठी माणसाला 'झापडबंद' भूरळ घातली. कुसुमाग्रजांच्या कविता आणि कानेटकरांची नाटके हा मराठी माणसांच्या प्रतिष्ठेचा विषय होता. भीमसेन जोशींच्या मैफलींनी मराठी माणसांचा कान घडविला. मंगेशकर कुटुंबिय महाराष्ट्राच्या नव्हे देशाच्या सन्मानाचा विषय झाला. केवळ सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीत महाराष्ट्राची १९९० च्या दशकापर्यंत वेगाने वाटचाल झाली. त्यानंतर तंत्रज्ञानाच्या युगाने इथल्या सांस्कृतिक, साहित्यिक जडणघडणीला वेगळे वळण मिळाले. जागतिकीकरणाच्या रेट्याने नवे लेखक सीमित झाले. वृत्तपत्रांनीही नव्या जगाशी जमवून घेणे सुरू केले. गोविंद तळवलकर, बुद्धिप्रामाण्यवादी वर्गात लोकप्रिय होतेच पण गडकरींनी लोकांमध्ये जाऊन संपादकाचे फिल्डवर्क जनतेपुढे मांडले. १९७० ते १९८० च्या दशकापर्यंत विचारांची दिशा आणि दृष्टी स्पष्ट होती. त्यानंतरच्या तंत्रज्ञान युगाने सारेचजण गडबडून गेल्याचे दिसते. 'मार्केटिंग'चा दबाव गेल्या १५-२० वर्षात इतका वाढला की नवनिर्मितीपेक्षा अनुवादित साहित्याकडे लोकांचा कल वाढला. प्रसारमाध्यमेही तंत्रज्ञानाचा अंगिकार करून नव्या दिशेकडे झेपावू लागली. ग्लॅमरस जगात सर्वच माध्यमांना आनंद वाटू लागला. त्यामुळे आहे-नाहीची दरी वाढतच गेली. आज शहरीकरणाच्या वेगाने कोणाचे प्रश्न मांडायचे हाच प्रश्न निर्माण झाला आहे. प्रत्येकाला भौतिक सुख हवे आहे, त्यासाठी कोणतीही किंमत मोजण्याची तयारी आहे. अर्थात ही न टाळता येणारी प्रक्रिया आहे. यातूनही महाराष्ट्रचे स्वतंत्र अस्तित्त्व टिकवीत वाटचाल करायची आहे. बदलत्या प्रवाहाशी जुळवून घेत महाराष्ट्राच्या बुद्धिप्रामाण्यांनी वाटचाल केली तर जागतिकीकरणाच्या जडजंजाळातून हे राज्य सहीसलामत बाहेर येऊ शकेल.

**– विनायक पात्रुडकर**
patrudkar@gmail.com

# जनसंवाद हा वैचारिक गट सुरू होण्यासाठी प्रेरणा

## सु.गो. तपस्वी

'रुची' हे 'ग्रंथाली' चळवळीने मराठी समाजाला दिलेले एक व्यासपीठ आहे. आजवर विविध चळवळींनी ह्या व्यासपीठाचा आधार घेतला आहे. ग्रंथालीच्या साहाय्यातून महाराष्ट्रातील चाळीसेक विचारवंत, लेखक, एनजीओजशी संबंधित व्यक्ती, माध्यम प्रतिनिधी वगैरे मंडळींनी सामाजिक हिताच्या दृष्टिकोनातून देशातील परिस्थितीवर विचारविनिमय साधला; त्या बैठकीतूनच गेल्या वर्षी 'जनसंवाद' हा वैचारिक गट उदयास आला. 'रुची'ने वर्षभर 'जनसंवाद'चे विचार आपल्यापर्यंत दरमहा पोचवले आणि आगामी वर्षातसुद्धा जनसंवाद ह्याच सदरातून वाचकांशी संवाद साधणार आहे. 'ग्रंथाली'च्या विश्वस्तांचे आभार मानून प्रस्तुत लेखाला सुरुवात करु या.

**सामाजिक बांधिलकी**

सूर्य मावळला, दिवसाची कामे संपली की पिंपळाच्या पारावर वा एखाद्या धार्मिक वास्तूच्या आवारात खेड्यातील मंडळी शिळोप्याच्या गप्पांसाठी एकत्र यायची, परिसरात घडणाऱ्या गोष्टींचा आढावा घेतला जायचा, ओघाने आपापसातील अडचणींवर, समस्यांवर पण चर्चा व्हायच्या. ह्या प्रक्रियेतून ओळख, परिचय व जिव्हाळा निर्माण व्हायचा आणि आपापसात आपुलकी जोपासली जायची; सामाजिक बांधिलकीसाठी गरजेचे किमान वातावरण तयार व्हायचं.

छोटी-मोठी शहरे वसत गेली तेव्हा शहरात आलेली माणसे नवखी असत, एकमेकांच्या साहाय्याची त्यांना गरज असे. त्यांच्यातील परस्परावलंबनाची भावना जागृत होती; मदत घेतली व दिली जायची. एकमेकांचे प्रश्न सोडवणं त्याकाळी भाग होते, कारण नागरीव्यवस्था पूर्ण विकसित झालेली नव्हती.

हळुहळू शहरात वसाहती निर्माण होत गेल्या, त्या वसाहतींमध्ये उपरोक्त कारणास्तव सार्वजनिकतेला महत्त्व दिलं गेलं; वाडे आले, वाड्या आल्या, चाळी निर्माण झाल्या. सदस्यांच्या एकमेकांशी असलेल्या खास परिचयातून खऱ्याखुऱ्या 'सहकारी संस्था', सोसायट्या स्थापन झाल्यामुळे त्या वसाहतीतील 'ब्लॉक'मध्ये राहणाऱ्यांचे आपापसातील स्नेहसंबंध कायम राहिले, सामाजिक बांधिलकीला कुठेच अडसर निर्माण झाला नाही.

स्वातंत्र्यानंतर देशात, खऱ्या अर्थाने, प्रगतीचा आरंभ झाला आणि १९६०च्या सुमारास उपरोक्त परिस्थिती बदलण्यास सुरुवात झाली. हळुहळू शहरीकरणाला जशी सुरुवात झाली तशी गावोगावी वस्ती वाढू लागली आणि देशाच्या शासनानेही अनेक सेवा पुरवायला सुरुवात केली. कायदे आले, कर आले, कामधंदे वाढले - त्यांतील व्यस्तता वाढली, देशाची व जनतेची प्रगती व्हायला सुरुवात झाली, पैसा खेळता झाला आणि त्यामुळे उपभोगाचे महत्त्व वाढायला लागले; धंदेवाईकपणा आला, स्वत:पुरता विचार करायला सुरुवात झाली - अघळपघळ वागणं कमी झालं - औपचारिकता वाढली आणि तशा वागण्याला 'व्यवहारी' हे लेबल चिकटवलं गेलं.

ब्रिटिशांनी पहिली मुंबई वसवल्यानंतर १९७० च्या दशकात दुसरी - नवी मुंबई - निर्माण झाली आणि आज तर 'मुंबई' शहर कुठे संपते हेच कळेनासे झाले आहे. त्याच दशकात शहरीकरणाच्या प्रक्रियेने जोम धरला आणि खरा वेग आला तो गेल्या दहा-पंधरा वर्षांत, उदारीकरणानंतर (लिबरलायझेशन) व जोडीला, झालेल्या माहितीतंत्रज्ञानातील भरभराटीनंतर. त्या तीस-पस्तीस वर्षांत माध्यमांनीसुद्धा एक सामाजिक क्रांती घडवून आणली. त्या कालखंडाचे समाजाला जसे फायदे झाले तद्वत काही अनिष्ट परिणामसुद्धा आता नजरेस येताहेत.

शहराशहरांतून वर्तमानपत्रांच्या आवृत्त्या निघू लागल्या, माहिती व करमणुकीची अनेक प्रकाशने बाजारात येऊ लागली, नाटक व चित्रपटसृष्टी बहरात आली. रेडिओ, टीव्ही, व्हिडिओ, संगणक, इंटरनेट, इ-मेल, टेलिफोन, मोबाईल इत्यादी करमणुकीची व संपर्काची साधनं सामान्यांना, मध्यमवर्गाला जसजशी सहज उपलब्ध होत गेली तसतशी समाजातील सार्वजनिकता लयास जाऊ लागली, सामूहिक धार्मिक कार्यक्रमांना ओहोटी लागली, जनतेचे जीवनमान 'खाजगी' होत गेले; गृहनिर्माणाचा धंदा झाला, अनोळखी लोकांच्या सोसायट्या 'बिल्डर' स्थापन करू लागला, व्यावसायिक घरबांधणीत सवलती उपभोगण्यासाठी 'अपार्टमेंट'ची स्थापना झाली. चाळीतील दोन खोल्यांतून मध्यमवर्ग तीन खोल्यांच्या 'फ्लॅट'मध्ये आला, भांबावला!

शेजाऱ्याला विस्तारीत कुटुंबच मानणारा माणूस अनोळखी शेजाऱ्याकडे दह्यासाठी विरजण मागताना कचरू लागला, मागण्यापूर्वी दहा वेळा विचार करू लागला;

पाहुणे आल्यावर वाटीभर साखर मागण्यासाठी बाजूच्या ब्लॉकचं दार ठोठावण्यास लोकांना संकोच वाटू लागला. कालांतराने, शेजाऱ्याच्या तशा वागण्याकडे लोक भुवया उंचावून बघायला लागले! हळुहळू शेजाऱ्याचं पहिलं नाव लोक विसरायला लागले आणि आज तर शेजाऱ्याचं आडनाव माहीत असलेली माणसे सापडणे कठीण होऊन बसले आहे.

''शहराच्या कारभार नगरपालिका व सोसायटीचा कारभार 'मॅनेजिंग कमिटी' बघेल, मी कशाला नाक खुपसू?'' ही भावना पर्यायाने दृढ होत गेली. आजचा मध्यमवर्ग तर दोन वा तीन बेडरूम्सच्या टॉवरमधील 'फ्लॅट'च्या शोधात असतो. ह्या मार्गावरच कुठंतरी सामाजिक बांधिलकी हरवायला सुरुवात झाली. शहरातच जन्माला आलेली नवी पिढी 'मूळ' गावाला अपरिचित झाली, धावपळीच्या आणि शास्त्र व विज्ञानाच्या युगात वैयक्तिक आयुष्यातही पारंपरिक धार्मिक विधींना व सोहळ्यांना आळा पडू लागला, कुटुंब नियोजनातून चौकोनी कुटुंबे तयार होऊ लागली, स्वत:च्या जबाब-दारीच्या भानातून इतरांच्या जबाबदारीतून माणूस मुक्त व्हायला लागला; सामाजिक बांधिलकी जवळपास लयाला गेली!

**एनजीओज**

असे वाटते की एनजीओजच्या व्यापक प्रसाराला स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधींच्या 'आश्रमा'तून सुरुवात झाली. समाजाशी जवळीक निर्माण करणे आणि त्या जवळिकीतून जनतेला लढ्यात खेचणे, हा सारासार सामाजिक मानसिकतेचा विचार गांधींनी केला असल्यास ते संयुक्तिक वाटते. देशाला, देशातील जनतेला जाणून घेण्याकरता गांधी देशभर फिरले. तालुका-तालुक्यातील खेडोपाडी पोचले. मनमाड-निफाडसारख्या छोट्या छोट्या गावांत त्यांच्या सभा झाल्या, देशातील सामान्य माणूस गांधींना चेहऱ्याने ओळखू लागला. परंतु ते पुरेसे नव्हते; कानाकोपऱ्यातील नागरिकांशी संवाद साधण्याकरता गांधी गावोगावी परत परत पोचू शकणार नव्हते आणि वैयक्तिक संपर्कात राहून, स्वातंत्र्याचं महत्त्व पटवून देऊन ते लोकांना स्वातंत्र्य-लढ्यात सामील करून घेऊ शकणार नव्हते; अशा जनसंपर्कासाठी पुरेसा वेळ कोणताही राष्ट्रीय पातळीवरील पुढारी काढू शकत नाही.

प्रचाराचे, वैयक्तिक संपर्काचे काम कोणत्याही चळवळीत गावोगावच्या स्थानिक कार्यकर्त्यांकडूनच होऊ शकते. ते काम जर कार्यकर्त्यांवर सोपवायचे तर त्यांची लोकांशी जवळीक निर्माण होणं गरजेचे होते; गांधींच्या आश्रमांनी ते साधले. आश्रमांनी प्रवचनांतून प्रचार साधला, लोकांच्या सेवेला महत्त्व दिलं, स्थानिक कार्यक्रम सादर केले, कार्यकर्त्यांबद्दल समाजात आदर निर्माण केला, त्या वलयातून विश्वास निर्माण झाला, कार्यकर्त्यांच्या हाकेला ओ देण्यासाठी स्वयंसेवक तयार झाले, 'चले जाव'च्या एका घोषणेतून गांधींना लाखो लोकांकडून शासनाचे तुरुंग भरता आले, चळवळ यशस्वी झाली.

बघायला गेले तर गांधींच्या खूप आधीपासून सामाजिक व धर्मादाय संस्था कार्यरत होत्या; त्यांची सुरुवात मात्र निव्वळ सेवाभावाच्या उद्दिष्टांतूनच व्हायची. समाज परिवर्तनासाठी अनेक चळवळीदेखील त्याच काळात सुरू झाल्या होत्या. एनजीओ आणि एखादी चळवळ ह्या दोन्हीही गोष्टी जरी 'समाजकार्य' ह्या सदरात मोडत असल्या तरी दोन्ही कामात बराच फरक आहे. गांधींची चळवळ तर स्वातंत्र्यासाठी आणि राजकारणाची होती, सामाजिक परिवर्तना-साठी नव्हती; आज जरी तसं सिद्ध करू शकत नसलो तरी स्वातंत्र्यचळवळीपुढे गांधींच्या आश्रमांचे स्थान दुय्यम होतं, असं म्हणण्यास वाव आहे.

आजच्या अनेक एनजीओज् ह्या धंदेवाईक (प्रोफेशनल) असतात, त्यांतील अनेकांची गणना सरसकट 'सामाजिक संस्था-सेवाभावी संस्था' म्हणून करणं गैर आहे; त्यांच्या उद्दिष्टांमध्ये काहीही गैर नसूनही! किंबहुना, असं म्हणता येईल की त्याचसाठी त्यांनी धंदेवाईकच असावं. शासकीय, शासनानं ठरवलेले (आऊटसोर्स्ड) काम शासनाच्या चौकटीत राहून करणारे ते कंत्राटदार असतात. कंत्राटदार म्हटलं म्हणून कामचुकारपणा व भ्रष्टाचार आलाच, असं मानणं चुकीचे आहे; ते कंत्राटदारी पेशाला दूषणे दिल्यासारखं ठरेल. खरं तर, काम कोणतेही असो एनजीओ असो वा स्वयंसेवी संस्था, कंत्राटदार वा उद्योजक, शासकीय अधिकारी असो वा खाजगी व्यावसायिक, कामचुकारपणा व भ्रष्टाचाराचं प्रमाण सारखंच अनुभवास येते, कारण ते सर्व एकाच समाजाचे सदस्य असतात.

एखादी स्वयंसेवी सामाजिक संस्था आणि एनजीओ ह्यांच्या दृष्टिकोनात फरक असतो. निवडलेल्या वस्तीला पाणीपुरवठा करण्यासाठीच्या प्रकल्पाचेच उदाहरण घेऊ, जे काम कोकणातील देवरूख येथील 'मातृमंदिर' ही स्वयंसेवी सामाजिक संस्था गेली कैक वर्षं करत आली आहे. एखादी एनजीओ अशा प्रकल्पाची निवड करताना तो प्रकल्प शासकीय योजनेनुसार निवडते. 'मातृमंदिर'सारखी स्वयंसेवी सामाजिक संस्था मात्र स्थानिक समस्येसाठी कामाची निवड करते; जर ते काम शासकीय योजनेत बसत असेल तर शासकीय अनुदान घेते, अन्यथा लोकांची वर्गणी व संस्थेच्या निधीतून प्रकल्प पूर्ण केला जातो.

एकीकडे एनजीओजच्या संख्येत प्रचंड वाढ होत असली, त्यांचे कार्य कौतुकास्पद असलं, परिघातील लाभार्थींना त्या संस्था कितीही साहाय्यभूत ठरल्या, त्या धंदेवाईक एनजीओज असोत वा स्वयंसेवी सामाजिक संस्था आणि त्यांचं अस्तित्व देशाला गरजेचं आहे, त्या संस्था मोलाचे काम करताहेत हे कबूल केले तरीही, त्या व तशा संस्थांकडून आपण प्रत्यक्ष समाजसुधाराची अपेक्षा करू शकत नाही. समाजसुधाराकरता समाज ढवळून काढावा

लागतो, तरच वृत्तीबदल साधण्याची शक्यता असते. मात्र, कोणत्याही एनजीओला वा स्वयंसेवी सामाजिक संस्थाचालकाला परिघाबाहेर बघणं शक्य नसते. त्यांनी बघूही नाही. कारण तसे केले तर अंगिकारलेल्या कामावर ते लक्ष केंद्रित करू शकणार नाही, अयशस्वी ठरतील.

**परिवर्तनातून समाजविकास**

स्वातंत्र्यापूर्वी सुरू झालेल्या अस्पृश्यता निवारण, स्त्री-मुक्ती व स्त्री-हक्क आणि कामगार संघटना ह्या सामाजिक चळवळी होत्या. त्या चळवळींमुळे देशाच्या राजकारणावर पडलेले दबाव व त्यामुळे शासनाकडून झालेल्या बदलांचे, कायद्यांचे होणारे सुयोग्य परिणाम आपण अनुभवले आहेत, उपभोगतो आहोत. चळवळीतूनच संघर्षाला वाचा फुटते, विषय धसास लावला जातो, समाज ढवळून निघतो, समाजात वृत्तीबदल साधता येतो. मात्र, जे घडते ते शासनातर्फे व शासनाकडूनच, ती जबाबदारी कोणतीही एनजीओ घेऊ शकणार नाही. समाजसुधाराच्या कामाला मर्यादा नसतात; नव्हे, ते कार्य देशव्यापी चळवळीचा साधू शकतात.

स्वातंत्र्यानंतर लोकशाही आली; जनतेचं शासन आलं. तरीही, देशातील सर्व सामाजिक समस्यांसाठी, जाणवणाऱ्या उणिवांसाठी शासनाला दोष देऊन आपण मोकळं होतो. सर्व माध्यमांतून हेच मनावर ठसवलं जातं की कोणत्याही चुकीला शासन-प्रशासनच जबाबदार असतं. ह्या स्वत: नामानिराळं राहून शासनावर टीका करण्याच्या प्रक्रियेत आम्हा सर्वांनाच विसर पडलेला असतो की लोकशाहीत जनताच शासन निवडते, तेच शासनकर्ते असतात आणि शासनाच्या कारभारातून समाजाचेच प्रतिबिंब समोर आलेले असते. काय व्हायला पाहिजे?

आम्हाला देशातील सध्याच्या परिस्थितीत खरोखर सुधारणा साधण्याची गरज भासत असेल तर आम्ही शासनाच्या खुंटीवर आमची वस्त्रं टांगून मोकळे होऊ शकणार नाही; तसे करत आल्यामुळेच आज समाज नागवा भासतोय! लोकशाही हवी असेल, ती व्यवस्थित राबवायची असेल तर समाज स्वत: लोकशाहीला लायक ठरला पाहिजे. लोकशाहीला लायक असा सक्षम समाज आपोआप निर्माण होणार नाही. समाजात तो वृत्तीबदल साधण्यासाठी आम्हा साऱ्यांनाच प्रयत्न करावे लागतील; ते साधता येईल एखाद्या देशव्यापी चळवळीतूनच. तशी चळवळ सुरू होण्यासाठी सामाजिक बांधिलकीची लोकांना जाण असणे क्रमप्राप्त आहे आणि आपण आज त्याच भावनेला हरवून बसलो आहोत.

आपल्या आजच्या समाजाच्या मानसिकतेत सामाजिक बांधिलकीची ज्योत कशी पेटवता येईल? हा प्रश्नच 'जनसंवाद' सुरू होण्यामागची प्रेरणा आहे आणि म्हणूनच जनसंवादचे घोषवाक्य आहे,

**आपण नाही तर कोण आणि**
**आता नाही तर केव्हा**

वाचकांनो, पुढे या,
सदस्य होण्यासाठी संपर्क साधा!

**सु. गो. तपस्वी**
जनसंवाद
९७६६२ ५२२५३
email : suhas@fandsindia.com

## स.न.वि.वि.

रुची फेब्रुवारी २०१-० अंकातील 'अमेरिकेच्या विविधतेमधील एकता' हा डॉ. विजय जोशी यांचा लेख आवडला. आपल्याकडे विविधतेमध्ये विषमताच आढळते हे आपले दुर्दैव.

'धार्मिक विविधता असूनही अमेरिकनांच्या विचारसरणीत प्रत्येक नागरिकाच्या धार्मिक स्वातंत्र्याचे तत्त्व ठामपणे प्रस्थापित झाले आहे आणि कोणत्याही प्रकारचा धार्मिक, राजकीय अथवा सामाजिक संघर्ष न करता प्रत्येक जण स्वत:च्या धर्माचे पूर्णत: पालन करू शकतो.' असे लेखात म्हटले आहे त्याचा प्रत्यय अमेरिकेत स्थायिक झालेल्या सगळ्यांनाच येतो. तेथील ग्रामीण भागातही जवळ जवळ शहरांसारख्याच सुविधा मिळत असल्याने तेथे शहरी-ग्रामीण अशी भारतासारखी विषमता सहसा दिसत नाही.

विनामूल्य शालेय शिक्षण, सर्वांना समान संधी, गरजूंकरता माफक किंमतीची/भाड्याची घरे, गृहहीनांना निवारा, निराधारांना आर्थिक मदत हे सर्व कागदावरच आहे. स्वार्थाने बरबटलेले राजकारणी व नोकरवर्ग यांनी जो भ्रष्टाचार चालवला आहे त्यात हे सर्व वाहून गेले आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर ६२ वर्षांनी सरकारला जाग आली नि वयाच्या १४ वर्षांपर्यंतच्या मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण दिले जाणार अशी घोषणा करण्यात आली. हा उपक्रम होताच तो नव्याने जाहीर करण्यात आला. या उपक्रमाची अंमलबजावणी कशी होणार ते देवच जाणे.

रुचीचा मार्च २०१०चा अंक वाचला. मराठी माणूसच राहणार आहे. आपण आपल्या हिताचे पाहावे. वेगळ्या विदर्भाच्या मागणीला जोर चढला असताना बेळगावला महाराष्ट्रात कशाला ओढायचे? बाबुराव पटेल यांच्यावरचा शशिकांत गद्रे यांचा लेख वाचून त्या काळात वावरल्या-सारखे वाटले. त्यांचे पूर्वीचे आडनाव पाटील होते हे माहीत नव्हते. मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणे एकापेक्षा एक सरस. अनुराधा गांगल यांच्या वाडा संस्कृतीने जुन्या आठवणी जाग्या झाल्या.

**बाळ सितूत**
ए ४, वीरेश्वर प्रकाश,
नेहरू रोड, विलेपार्ले (पूर्व),
मुंबई ४०० ०५७
फोन : २६१५३११३

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011 | RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

## संदेश भंडारे यांच्या 'असाही एक महाराष्ट्र' या पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन



प्रकाशन समयी लेखक-छायाचित्रकार संदेश भंडारे, परिमल चौधरी, मोहन आगाशे, वसंत आबाजी डहाके, सुधीर पटवर्धन आणि ग्रंथालीचे विनायक गोखले व सुदेश हिंगलासपूरकर

---


## पंखाविना भरारी
### शरयू घाडी




नुकतीच प्रसिद्ध झालेली दोन महत्त्वपूर्ण पुस्तके

प्रस्तावने रेखाटलेल्या चित्रांपैकी सहा चित्रांचा खास बनवून घेतलेला भेटकार्डांचा संच पहिल्या आवृत्तीपर्यंत विनामूल्य दिला जाईल.

मूल्य २०० रुपये, सवलतीत १२० रुपये

### कमल देसाई



मूल्य ३०० रुपये
सवलतीत १५० रुपये


'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता जयमल्हार प्रिंटिंग प्रेस, २१७, आशीष इंडस्ट्रियल इस्टेट, दादर (प) येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.